www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दैं. युवक आधार करीता
प्रतिनधिी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 248 वा शुक्रवार दि. 23 मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# परिवहन विभागाकडून व्यावसायिक वाहनांना गती मर्यादा उपक्रमाची सक्ती निवडक उत्पादकांसाठी!

## नवी मुंबई सहराज्यात व्यासायिक वाहनचालकाचा असहकार्य

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, प्रतिनिधी**

विविध प्रकारची व्यावसायिक वाहने भरधाव पळवू नयेत.त्यामुळे अपघातावर नियंत्रण यावे.म्हणून केंद्र शासनाच्या आदेशाने 14 वर्षापूर्वी स्पीड गव्हर्नर म्हणजेच गती मर्यादा उपकरणे व्यावसायिक वाहनात कार्यान्वित करण्यात आली.त्या अनुषंगाने व्यावसायिक चालकांनी शासनाच्या आदेशाने कार्यवाही देखील केली.परंतु अलीकडे राज्यात अचानक परिवहन विभागाकडून निवडक उत्पादकांकडून गती मर्यादा उपकरण बसविण्याची सक्ती केली.यामुळे नाहक या व्यावसायिक वाहन चालकावर आर्थिक बोजा पडू लागला.त्यामुळे नवी मुंबईसह राज्यातील सर्वच व्यावसायिक वाहन चालकांनी फिटनेस नूतनीकरणाचा शुल्क भरण्याचे बंद केल्याने कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. देशभरात व्यावसायिक वाहनांवर स्पीड गव्हर्नर (गती मर्यादा उपकरणे) बसवणे 2011 पासून केंद्र सरकारने बंधनकारक केले आहे. इतर बहुतांश राज्यांनी याचे तातडीने पालन सुरू केले होते.तसेच राज्यात देखील सुरू होते. मात्र महाराष्ट्र परिवहन विभागाने 2024-25 पासून अचानक निवडक उत्पादकांकडून मिळणाऱ्या 16 अंकी क्रमांकाच्या एसएल डी (डशिशव ङळाळींळपस ऊर्शींळलश) ची सक्तीने अंमलबजावणी सुरू केली आहे




> वाहन फिटनेस व नूतनीकरण प्रक्रिया तात्काळ पुन्हा सुरू करावी.पूर्वीपासून बसवलेले कार्यक्षम व वैध एसएलडी स्वीकारावेत.16 अंकी क्रमांकाची सक्ती रद्द करावी.
> वाहनधारकांना झालेल्या नुकसानीबद्दल भरपाई द्यावी व दुरुस्तीकडे तत्काळ पावले उचलावीत. तसेच या बाबत नवी मुंबईसह परिवहन विभागाला आम्ही निवेदन दिले आहे.
> **हरप्रीत सिंग माणिकताला,प्रदेश सरचिटणीस, संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटना,राज्य.भाजप**

नवी मुंबईतील उपप्रादेशिक कार्यालयात देखील निवेदन देऊन स्पीड गव्हर्नर विषयी सक्ती करू नये.अशा प्रकारची मागणी केली आहे.
ड.अमरदीप सिंग गिल, सामाजिक कार्यकर्ता.

आणि हे महागडे असल्याने व्यावसायिक वाहन चालकांचे म्हणणे आहे. आजच्या परिस्थिती मध्ये बहुसंख्य वाहनांवर आधीपासूनच वैध स्पीड गव्हर्नर बसवलेले आहेत. ते वाहन विभागाच्या 'वहन' प्रणालीमध्ये नोंदणीकृत देखील आहेत. तरीही आता परिवहन विभागाने फक्त निवडक उत्पादकांकडून येणाऱ्या 16 अंकी क्रमांकाच्या नवीन उपकरणांची सक्ती केली आहे .त्यामुळे 25 एप्रिल 2025 पासून संपूर्ण महाराष्ट्रात फिटनेस नूतनीकरणासाठीचा शुल्क भरणे बंद झाले असल्याचे सांगण्यात येते.त्यामुळे परिवहन विभागाला मात्र आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. यापूर्वीही 07 फेब्रुवारी 2025 रोजी हाच प्रकार घडला होता, तेव्हा विभागाने हा तांत्रिक बिघाड असल्याचे स्पष्टीकरण दिले होते. मात्र 2 महिन्यांनंतर तोच प्रकार पुन्हा घडत असल्याचे व्यावसायिक वाहन चालकांचे म्हणणे आहे.विशेष म्हणजे 30 एप्रिल 2025 रोजी एमओआरटीएच हेल्पडेस्ककडून आलेल्या ई-मेलमध्ये स्पष्ट सांगितले आहे की,ही बाब महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाशी संबंधित आहे. कृपया संबंधित विभाग,प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधावा.परंतु परिवहन कार्यालयाशी संपर्क साधल्यावर तिथेही काहीही फायदा होत नसल्याचे व्यावसायिक वाहन चालकांचे म्हणणे आहे.

**या निर्णयाचे दुष्परिणामः**
वाहनांच्या फिटनेस प्रमाणपत्र आणि नूतनीकरणाची प्रक्रिया थांबली असून दैनंदिन वाहतूक कामकाजावर परिणाम झाला आहे.
वाहनधारकांना 5700 ते 8500 रुपयांपर्यंत खर्च करून फक्त निवडक उत्पादकांकडून उपकरणे खरेदी करण्यास भाग पाडले जात आहे.
महाराष्ट्र सरकारला मोठ्या प्रमाणावर महसूल तोटा सहन करावा लागत आहे.
वाहनचालक व मालक आर्थिक व मानसिक त्रासात सापडले आहेत.

वाहनधारकांचे प्रश्न..
16 अंकी एसएलडी व इसीयु क्रमांक अचानक कुठून आले? पूर्वी विक्री झालेल्या एसएलडी उपकरणांमध्ये हे 16 अंकी क्रमांक का नव्हते? असे असल्यास, टी.सी. (प्रादेशिक कार्यालय) ने या उपकरणांची विक्री कशी मान्य केली? उद्या जर एसएलडी उत्पादकांनी 20 अंकी क्रमांक तयार केला, तर पुन्हा नवीन उपकरण बसवावे लागणार का?अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

**धोरणात्मक बदल..**
फिटनेस बाबत तारीख घेताना एक संदेश दिसतो.त्या मध्ये असे म्हटले आहे की,एसएलडी (स्पीड लिमिटिंग डिव्हाइस) अनुक्रमांक हा एमओआरटीएच मार्गदर्शक तत्त्वांनुसार 16 वर्ण क्रमांक नाही, कृपया तो रेट्रोफिटमेंट सेंटरमध्ये अद्यतनित करा आणि नंतर भेटीसाठी पुन्हा अर्ज करा.यावरून हे स्पष्ट करते की हा तांत्रिक बिघाड नसून धोरणात्मक बदल आहे असेही व्यावसायिक वाहन चालकांचे म्हणणे आहे.

वरिष्ठांच्या आदेशाने ही कार्यवाही सुरू आहे.
दत्तात्रेय सांगोलकर,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,नवी मुंबई.

वाहन फिटनेस व नूतनीकरण प्रक्रिया तात्काळ पुन्हा सुरू करावी. पूर्वीपासून बसवलेले कार्यक्षम व वैध एसएलडी स्वीकारावेत.16 अंकी क्रमांकाची सक्ती रद्द करावी.
वाहनधारकांना झालेल्या नुकसानीबद्दल भरपाई द्यावी व दुरुस्तीकडे तत्काळ पावले उचलावीत.तसेच या बाबत नवी मुंबईसह परिवहन विभागाला आम्ही निवेदन दिले आहे.
**हरप्रीत सिंग माणिकताला,प्रदेश सरचिटणीस,संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटना,राज्य.भाजप**

## आसेगाव सर्कल महावितरण अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये 3. दिवसापासून वीजपुरवठा गायब. संबंधित कर्मचारी घेत आहेत झोपेचं सोंग.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपिर तालुक्यातील आसेगावं सर्कल महावितरण अंतर्गत येणारी गावे पिंपळगाव, लही कुंभी वसंतवाडी अशी इत्यादी गावे येतात आता उन्हाळ्यामध्ये उकाडा जाणवत आहे. त्यामधे अवकाळी पावसाचे सावट. घरामधे वयोवृद्ध मानस असतात. तसेच लहान सहान बाळ असतात अशा वातावरणामध्ये महावितरण दोन दोन दिवस लाईट बंद ठेवतात महावितरण कडे सर्वसामान्यांचे लागले लक्ष.



सर्वसामान्य खेड्यापाड्यातील लोकांचे होत आहेत हाल. आमच्या उज्वल मालेगावच्या प्रतिनिधीशी बोलताना शिवसेना कार्यकर्ते राहुल माळी यांनी महावितरण बद्दल केली खंत व्यक्त त्यांनी सांगितलं की दोन दोन दिवस लाईट येत नाही बुवा.. अशातच महावितरणचे जे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष घालून तात्काळ आसेगाव सर्कल महावितरण येथे जो कोणी कर्मचारी असेल त्यांच्यावर तात्काळ कारवाई करून सर्वसामान्य लोकांना वीज पुरवठा सुरळीत करावा. व तथा न्याय द्यावा.

## मंगळसूत्र चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : श्रीवर्धन ते मुंबई या एसटी बसच्या प्रवासात एका घरकाम करणाऱ्या प्रवासी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी झाले. मुंबई येथील कुलाबा येथे राहणारी 36 वर्षीय महिला मुंबईला एसटी बसमधून प्रवास करत होत्या. त्या पनवेल बस आगारात बस थांबल्यावर त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी झाल्याचे समजले. या घटनेनंतर पीडित महिलेने एक लाख रुपयांचे गळ्यातील मंगळसूत्र चोरी केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंदवली.

## 'एन' विभागात डोंगर उतारावर राहणाऱ्यांनी सुरक्षितस्थळी स्थलांतरित व्हावेः बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

'एन' विभाग कार्यालय हद्दीतील विक्रोळी पार्कसाईट, विक्रोळी (पश्चिम) आणि घाटकोपर (पश्चिम) भागातील वर्षानगर, रामनगर, संजय गांधी नगर, राहुल नगर, गणेश नगर, खंडोबा टेकडी, आझाद नगर, सोनिया गांधी नगर, प्रेम नगर व आनंद नगर या ठिकाणी डोंगराळ परिसरातील झोपडपट्टीवासियांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. दरम्यान, एन विभाग कार्यालयातर्फे वरिल ठिकाणी राहणाऱ्या रहिवाशांना सावधानतेच्या सूचना / नोटीस आधीच देण्यात आल्या आहेत. तरीही स्थलांतर न करता तेथेच राहणाऱ्या रहिवाश्यांची जबाबदारी त्यांची स्वतःची असेल.नैसर्गिक आपत्तीने कोणत्याही प्रकारची दुर्घटना अथवा जीवित अथवा वित्तहानी झाल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन त्यास जबाबदार राहणार नाही, असे 'एन' विभागाचे सहायक आयुक्त यांनी कळविले आहे. पावसाळ्यादरम्यान दरडी कोसळण्याची, डोंगरावरुन वाहत येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळे भूस्खलन होऊन घरांची पडझड होण्याची तसेच नाल्यांना पूर येण्याची शक्यता असल्यामुळे झोपड्या वाहून जाण्याच्या संभाव्य घटना घडू शकतात. 'एन' विभाग कार्यालय हद्दीतील विक्रोळी पार्कसाईट, विक्रोळी (पश्चिम) आणि घाटकोपर (पश्चिम) भागातील वर्षानगर, रामनगर, संजय गांधी नगर, राहुल नगर, गणेश नगर, खंडोबा टेकडी, आझाद नगर, सोनिया गांधी नगर, प्रेम नगर व आनंद नगर या भागातील धोकादायक इमारतींना / झोपड्यांना एन विभाग कार्यालयातर्फे सावधानतेच्या सूचना / नोटीस आधीच देण्यात आल्या आहेत. त्यामुळे खबरदारी म्हणून संबंधित भागातील स्थानिक रहिवाश्यांनी स्वतःहून सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## उरण नागरी संरक्षण दलाच्या वतीने प्रशिक्षण शिबीर संपन्न



**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

नागरी संरक्षण दल एक अशी महत्व पूर्ण संघटना आहे की जी आपत्कालीन,नैसर्गिक,किंवा युद्धजन्य परिस्थितीत नागरिकांच्या रक्षणाचे काम करते.या संघटनेचा मूळ उद्देश नागरिकांचे विविध आपत्ती पासून संरक्षण करणे आज देशात युद्धजन्य परिस्थिती सुरु असून लवकरच मान्सूनचे आगमन होण्याच्या तयारीत आहे. हिसरी परिस्थिती लक्षात घेता नागरी संरक्षण दलाचे जास्तीत मोठया संख्येने प्रशिक्षित स्वयंसेवक तयारकरणे ही कळाची जबाबदारी आहे. या साठी रायगड जिल्ह्यात उरण तालुकाहा अत्यंत सवेदनाशील तालुका असल्याने या ठिकाणी मोठया प्रमणात नागरी संरक्षण दलाचे स्वयंसेवक तयार होणे आवशयक असल्याने रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख किशन जावळे साहेबांनी रायगड जिल्ह्याचे नागरी संरक्षणदलाचे मुख्यालय असलेल्या उरण येथील कार्यालयात नागरी संरक्षण स्वयंसेवक प्रशिक्षित करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसर शनिवार दिनांक 17 ते 21 मे 2025 या 5 दिवसाच्या कालवधीत हे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते.या सत्रातील पहिल्या शिबिराला उत्तम प्रतिसाद लाभला असून या शिबिरात 20 युवक युवतींनी सहभाग घेतला होता या मध्ये युवतींची संख्या लक्षणीय होती. आज दिनाक 21 मे 2025 रोजी या शिबिराचा समारोप झाला. या समारोप प्रसंगी प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून मुख्य क्षेत्ररक्षक नवीन राजपाल,डॉ.सत्या ठाकरे,जेष्ठपत्रकार प्रदीप पाटील, सहा.उपनियंत्रक शशिकांत शीरसाट,नगराजशेठ स्कूलच्या प्रिन्सिपॉल सौ.ज्योती म्हात्रे,विभागीय क्षेत्ररक्षक हरेश्वर माजी मानसेवी अधिकारी नितेश घरत,मिथुन म्हात्रे.समीर थळी,आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी अनेक प्रशिक्षणार्थिनी आपली मनोगते व्यक्त केली तर, सौ.ज्योती म्हात्रे, प्रदीप पाटील, डॉ.सत्या ठाकरे, शशिकांत शीरसाट आदि मान्यवरांनी नागरी संरक्षण प्रशिक्षणाचे फायदेयाबाबत सविस्तरपणे माहिती दिली व प्रशिक्षण जीवनात किती महत्वाचे आहेहे सह उदाहरण सांगितले,यावेळी प्रशिक्षणार्थिनीच्या वतीने मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला या सुरेख समारोपाच्या कार्यक्रमाचे सूत्र संचलन हरेश्वर यांनी केले.

## आजच्या आरोग्य टिप्स

### काशाच्या वाटीने पायाला मालिश करण्याचे फायदे

1. शरीरातील उष्णता कमी करते.
2. शरीरातील थकवा कमी होतो.
3. कांस्य वाटीने मालिश केल्याने इम्युनिटी वाढते.
4. रक्तदाब योग्य राहण्यास मदत होते.
5. टाचांवरील भेगा कमी होतात.
6. कांस्य वाटीने मालिश केल्याने सांधेदुखी कमी होते.



## माजी नगरसेवकासह चार जणांविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

मुलाला मारहाण केल्याप्रकरणी माजी नगरसेवकासह चार जणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नरेश मोढे हे पनवेल येथे राहत असून 17 मे रोजी त्यांच्या टँकरचा चालक अजय हा पाणी भरण्यासाठी तक्का, दर्गा पनवेल येथे गेला होता. त्यावेळी श्रेयस बहिरा, माजी नगरसेवक अजय बहिरा, त्यांचा चालक आणि इतर एक जण यांनी मोढे यांच्या मुलाला व चालकाला बोअरवेलचे पाणी भरण्यास नकार दिला. आणि त्यांच्यासोबत वाद केला. यावेळी मोठ्या मुलाने नरेश मोढे यांना बोलावून घेतले. ते सुजल याच्यासोबत तेथे गेले असता चार जणांनी त्यांचा मुलगा चिराग याला लोखंडी रॉड सारख्या वस्तूने मारहाण केली व लाथा बुकयाने मारहाण केली. यावेळी मध्यस्थी केले असता चौघांनीही त्यांच्या लहान मुलाला आणि त्यांना मारहाण केली. या प्रकरणी चौघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.



## सुझुकी मोटर कंपनीच्या लकी ड्रॉ मध्ये जिंकली चार चाकी कार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**




सुझुकी मोटर कंपनी इंडियाच्या वतीने संपूर्ण भारतभर लकी ड्रॉ योजना राबवण्यात आली. या लकी ड्रॉ मध्ये पनवेलच्या कनक सुझुकी शोरुम मधून दुचाकी घेतलेले दत्ताराम मारुती भगत यांनी चार चाकी कार जिंकली. 21 मार्च रोजी त्यांना ही कार देण्यात आली. संपूर्ण भारतभरातून एकमेव कार विजेते दत्ताराम भगत ठरले. सुझुकी मोटर कंपनी इंडियाच्या वतीने एक सप्टेंबर 2024 ते 30 नोव्हेंबर 2024 पर्यंत गाडी घेणाऱ्या ग्राहकांसाठी लकी ड्रॉ स्कीम राबवण्यात आली. रोहा येथील दत्ताराम भगत यांनी सप्टेंबर महिन्यात बर्गमॅन ही दुचाकी पनवेल येथील कनक शोरूम मधून विकत घेतली. त्यामुळे ते या लकी ड्रॉ स्कीम मध्ये सहभागी झाले. लकी ड्रॉ चा निकाल नुकताच लागला. यावेळी प्रथम मेगा पारितोषिक मारुती सुझुकी फ्रॉन्स ही चार चाकी कार दत्ताराम भगत यांना लागली. 21 मार्च रोजी त्यांना ही कार देण्यात आली. यावेळी कनक शोरूमचे डायरेक्टर जितेश मारू, सुझुकीचे एरिया मॅनेजर रणवीर सिंह यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. यावेळी लकी ड्रॉ मध्ये कार जिंकलेले दत्ताराम भगत यांनी सर्वांचे आभार मानत कार मिळाल्याने आनंद झाला असल्याचे सांगितले आणि नागरिकांनी सुझुकी कंपनीच्या गाडी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

# प्रितम जनार्दन म्हात्रे यांचे भाजप जनसंपर्क कार्यालय लोकसेवेच्या कार्यासाठी ...लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी/ पनवेल :-** नव्याने भाजप पक्षात प्रवेश घेतलेल्या प.महा.के चे माजी विरोधी पक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या गुरु शरणम् कॉम्प्लेक्स विश्राळी नाका येथील जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन गुरुवार दि. २२ मे २०२५ रोजी लोकनेते माजी खासदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर,आ. महेश बालदी, आ.विक्रांत पाटील, मा. सभापती व महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी,




पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदी प्रितम म्हात्रे समर्थक पदाधिकारी व कायकर्ते मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी प्रितम म्हात्रे यां बोलताना सांगितले की, पक्ष कार्यालयाच्या माध्यमातून जूना नवा,गट तट न करता पक्ष संघटनात्मक धोरणातून देश सेवा व्हावी लोकउपयोगी कार्य व्हावे जसे नागरिकांच्या मूलभूत सुविधा मध्ये येणाऱ्या अडचणी शैक्षणिक क्षेत्रातील प्रवेश, शाळेचे दाखले, नागरिकांच्या समस्या, कुणालाही कसलीही मदत देण्यासाठी हे कार्यालय सदैव तत्पर आहे. दि. १० मे रोजी भाजपामध्ये पक्ष प्रवेश झाल्यानंतर लोकांच्या समस्या सोडवताना आमच्या सोबत विकासाच्या मुद्द्यावर अजूनही अनेक कार्यकर्ते भाजपामध्ये येत आहेत. त्याचा मला अभिमान आहे. हीच आमच्या कामाची पावती असून जो पर्यंत शेकाप मध्ये होतो तोपर्यंत पक्षाची पक्षनिष्ठा पाळत होतो , त्याचप्रमाणे आज ही असेल त्या पक्षात गद्दारी ही भावना न मनात कदापि नसेल . पक्षनिष्ठा बाळगून पक्षाचे व संघटनेच्या धोरणानुसार पूर्वीसारख्याच नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबध्द असल्याचे प्रितम म्हात्रे यांनी सांगितले.

## गेवराई सेमी, बनकिंन्होळा, बाभुळगाव,वरखेडी,भायगाव या पंचक्रोशीसाठी सक्रिय पूर्णवेळ वायरमन देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:** तालुक्यातील गेवराई सेमी, बनकिनोळा, भायगाव वरखेडी बाभूळगाव या गावामध्ये पूर्णवेळ सक्रिय वायरमन देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे कार्यकारी अभियंता अविनाश राऊत यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे, निवेदनात म्हटले आहे की या पंचक्रोशीमध्ये विजेची नेहमी समस्या असते पंचक्रोशीची लोकसंख्या व ग्राहक संख्या जास्त असून सुद्धा येथे वायरमन पूर्ण वेळ उपलब्ध होत नसल्याने ग्राहकांची मोठी तारांबळ होत असून मानसिक त्रास त्यांना सहन करावा लागत आहे, या भागामध्ये विजेच्या समस्येवरती पूर्णवेळ निराकरणाची गरज असून सक्षम सक्रिय माणूस उपलब्ध करून देण्यात यावे.

यावेळी पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रा.राहुलकुमार ताठे, युवक विधानसभा अध्यक्ष विजय पवार, युवक उपाध्यक्ष दादाराव गोडसे, खुशाल फरकाडे, द्वारकादास परकाडे, उत्तम ताठे, लक्ष्मण मख , नितीन माकोडे सर पदाधिकारी उपस्थित होते.




# मोरा ते भाऊचा धक्का सागरी प्रवास महागला.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

मोरा हे भारतातील उरण शहराला सेवा देणारे बंदर आहे. येथील रहिवाशांचा व्यवसाय मुख्यतः मासेमारीशी संबंधित आहे. मोरा भाऊचा धक्का हा प्रवास फायदेशीर सुखद आणि जलद म्हणून ओळखला जातो वाहतूक कोंडीची दगदग नसल्याने या सागरी मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे .त्याशिवाय दरवर्षी पावसाळी हंगामात गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा अलिबाग भाऊचा धक्का ते रेवस या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूकही बंद ठेवण्यात येते. यात मांडवा अलिबागकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोरा भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूहि बंद ठेवण्यात येते. परंतु सोमवार २६ मे पासून उरणच्या मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का दरम्यानचा जलप्रवास २५ रुपयांनी महागणार आहे. पावसाळ्यात अनियमित जलप्रवासामुळे महाराष्ट्र मेरीटाईम मंडळाकडून मोरा ते मुंबईच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे त्यामुळे या प्रवासाकरता प्रवाशांना एका फेरीसाठी ८० रुपयाऐवजी १०५ रुपये मोजावे लागणार आहेत. ही दरवाढ ४ महिन्यांसाठी लागू राहणार असून सप्टेंबर




पासून पुन्हा एकदा ८० रुपये दर करण्यात येतील. गेल्या अनेक वर्षापासून उरणच्या मोरा ते मुंबई दरम्यानची जलवाहतूक पावसाळ्यातही सुरू असते मुंबई ते अलिबाग दरम्यानची जलसेवा पावसाळ्यात बंद असते .अशा स्थितीत समुद्रातील लाटांचा सामना करीत मोरा मुंबई सेवा सुरू असते ,उरण ते नेरूळ बेलापूर ही लोकल सेवा सुरू झाली आहे त्यामुळे या मार्गावरील प्रवासी संख्या घटली आहे .या घटलेल्या प्रवासी संख्येचा फटका या विभागाला बसला आहे ,असे असले तरी या मार्गाने परंपरागत प्रवास करणारे प्रवासी आहेत त्यामुळे ही सेवा सुरू आहे .या सेवेसाठी मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी मोरा मुंबई जलमार्गासाठी २५ रुपयाची वाढ करण्यात आल्याची माहिती मोराबंदर अधिकारी नितीन कोळी यांना यांनी दिली आहे.

# नितीन बगाटे यांची रत्नागिरीचे पोलिस अधीक्षक म्हणून नियुक्ती

### रत्नागिरी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी बगाटे यांच्या नियुक्तीमुळे नागरिकांमध्ये उत्साह

**दैनिक युवक आधार**
**संगमेश्वर (शांताराम गुडेकर)**

रत्नागिरी जिल्ह्याचे नवे जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून नितीन दत्तात्रय बगाटे यांची नियुक्ती झाली आहे.माजी पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांची बदली झाल्याने ही जागा रिक्त होती.छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस उपायुक्त असलेले बगाटे हे डॅशिंग आयपीएस अधिकारी म्हणून ओळखले जातात.यापूर्वी त्यांनी सिंधुदुर्ग येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणूनही काम पाहिले आहे. हिंगोली जिल्ह्यातील निशाणा येथील रहिवासी असलेले बगाटे यांनी आयआयटीमधून शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुण्यात खासगी कंपनीत काही काळ नोकरी केली.सुरुवातीला शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या बगाटे यांनी नंतर आयपीएस परीक्षा उत्तीर्ण करून पोलीस सेवेत प्रवेश केला.२०१८ ते २०२० या कालावधीत ते परभणी येथे प्रशिक्षणार्थी सहायक पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत होते.परभणी,चंद्रपूर आणि सिंधुदुर्ग येथे त्यांनी आपल्या दबंग कामगिरीने



ख्याती मिळवली आहे.परभणी येथे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान बगाटे यांची तत्कालीन विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांच्याशी बाचाबाची झाली होती.राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सभेत डी झोनमध्ये शिरलेल्या कार्यकर्त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केल्याने हा वाद उद्भवला.तसेच,वाळू टिप्पर पकडल्यावरून त्यांचा खासदार संजय जाधव यांच्याशीही वाद झाला होता. या घटनांनी त्यांची कणखर अधिकारी म्हणून ओळख निर्माण झाली. रत्नागिरी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी बगाटे यांच्या नियुक्तीमुळे नागरिकांमध्ये उत्साह आहे. त्यांच्या अनुभवाचा उपयोग अवैध गतिविधींवर नियंत्रण ठेवण्यासाठी होईल, अशी अपेक्षा आहे.रत्नागिरीतील अंमली पदार्थांचा व्यापार नष्ट करण्याचे मोठे आव्हान बगाटे यांच्यासमोर असणार आहे.बगाटे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा अधिक प्रभावी होईल,अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## दिव्यांगांचा निधी ग्रामपंचायतींनी वाटप करावा ; दिव्यांग संघटनांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी**

ग्रामपंचायती अंतर्गत वार्षिक उत्पन्नाच्या पाच टक्के निधी हा दिव्यांग बांधवांना वाटप करण्यात येतो; परंतु, काही ग्रामपंचायतींकडून पाच टक्के निधी अद्याप वाटप झालेला नाही.तो त्वरीत वाटप करण्यात यावा, अशी मागणी सेक्युलर दिव्यांग मुव्हमेंट चे जिल्हाध्यक्ष अड.मिलिंद सर्पे व प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे अध्यक्ष भगवान मारपवार यांनी केली आहे. ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामपंचायतीच्या वार्षिक उत्पन्नाच्या पाच टक्के निधी हा दिव्यांग बांधवांना वाटप करण्यात येतो; परंतु, काही ग्रामपंचायतींकडून अद्याप पाच टक्के निधी वाटप झालेला नाही, तर काही ठिकाणी ग्रामसेवकांकडे वार्षिक उत्पन्नाची विचारणा केली असता, समाधानकारक माहिती मिळाली नाही, तसेच वार्षिक उत्पन्नाच्या कोणता कागदोपत्री लेखाजोखा दाखविण्यात आला नाही. ज्या ग्रामसेवकांनी निधी खर्च केला नाही अशा ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ही सर्पे व मारपवार यांनी केली आहे. पाच टक्के निधी खर्च केला नाही, तर दिव्यांग संघटनांकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, तसेच शासनाच्या घरकुल योजनेत दिव्यांग बांधवांना समाविष्ट करण्यात यावे व दिव्यांगांसाठीच्या विविध योजनांचे फलक ग्रामपंचायतीत दर्शनी भागात लावण्यात यावे, अशी मागणी दिव्यांग संघटनांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात करण्यात आली आहे. || काही ग्रामपंचायतचे उत्पन्न लाखामध्ये असूनसुद्धा ग्रामसेवकांकडून ग्रामपंचायतीचे उत्पन्न तोंडी कमी सांगण्यात येत आहे. त्यामुळे दिव्यांगांना त्यांच्या हक्काचा निधी प्राप्त होत नाहीय. बंद लिफाफ्यात तीनशे, पाचशे ते हजार रुपयांपर्यंत वाटप करून दिव्यांगांची चेष्टा करण्यात येत आहे.||
- भगवान मारपवार, प्रहार दिव्यांग क्रांती संघटना, किनवट तालुकाध्यक्ष

## कोरोना संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने घेतली आयुक्त मंगेश चितळे यांची भेट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**



कोरोना संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आज पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेवून आवश्यक त्या उपाययोजनांसदर्भात मागणी केली. वाढत्या कोरोना संकटाबाबत चर्चा आणि उपाययोजनांबाबत शिवसेना पक्षाच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याशी चर्चा करताना पूर्ण जगभरात,भारतात, तसेच महाराष्ट्रातील ठिकठिकाणी कोरोना संक्रमण पुन्हा डोकं वर काढीत असून, रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या अनुषंगाने महानगर संघटक मंगेश रानवडे यांच्या अध्यक्षतेखाली आज शिवसेना पक्षाचे पदाधिकारी यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व महानगरपालिका च्या पदाधिकाऱ्यांबरोबर याबाबत सखोल चर्चा केली. शिवसेना पक्षाच्या शिष्टमंडळामध्ये उपस्थित असलेले महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनवणे, खारघर शहर संघटक इम्तियाज शेख, विभाग संघटिका सौ ज्योती नाडकर्णी, पनवेल उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी, पनवेल उपसघटक सिद्धेश खानविलकर, पनवेल शहर प्रसिद्धी प्रमुख तोफिक बागवान, उपविभाग प्रमुख गुलाब बागवान यांनी आयुक्तांना कोरोना संकटाला आळा घालण्यास विविध उपाय योजनांची मागणी केली. त्यामध्ये लसीकरण क्वारंटाईन वार्ड उभा करणे, कोरोना टेस्टिंग ची यंत्रणा उभी करणे अशा विविध मागण्या नमूद केलेले निवेदन पनवेल महानगरपालिकेला सादर केले. आयुक्त मंगेश चितळे यांनी याबाबत शिष्टमंडळात माहिती देताना नमूद केले की सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच आपला दवाखाना मध्ये, कोरोना संबंधित अतिदक्षता व लक्षण असल्यास त्वरित ट्रीटमेंट संबंधी आदेश जारी केलेले आहेत व त्याचप्रमाणे खाजगी रुग्णालयांमध्ये सुद्धा याबाबतची सतर्कता सर्व डॉक्टरांना देण्यात येणार आहे.

## ईमरानभाई सय्यद यांनी स्वताच्या घरी कामाला असलेल्या हिंदु मुलीच लग्न हिंदु संस्कृती प्रमाने स्वखर्चाने लावले

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी प्रतिनिधी**
**योगेश सुतार**

चिपळूण गोवळकोट येथे राहणारे ईमरानभाई सय्यद यांनी स्वताच्या घरी कामाला असलेल्या हिंदु मुलीच लग्न हिंदु संस्कृती प्रमाने स्वखर्चाने लावून दिले. लहान पणी आई वडिलांचे छत्र हरवलेली प्रतीभा इमरान भाईच्या घरी गेले सोळा वर्षे तिथेच राहुन घरकाम करत सोळा वर्षे ईमरानभाई नी कधीही दुजाभाव न दाखवता स्वताच्या बहिणी प्रमाने वागवले आणि आता लग्नाची वेळ आल्यावर मात्र ईमरानभाई नी तीच्या ईच्छे प्रमाने हिंदु संस्कृतीप्रमाणे लग्न लावून दिले. केवळ विवाह लावून देयाचा म्हणून लावला नाही. नाही तर मुलांची परिस्थिती ची परिपूर्ण माहिती घेऊन हा विवाह ठरवण्यात आला . या विवाह सोहळ्यात ईमरानभाई चे संपुर्ण कुटुंब च सहभागी झाला होत. दागदागिने भांडी तसेच संसाराला लागणारे सर्व साहित्य देऊन सय्यद कुटुंबीयांनी सर्व जबाबदारी व कर्तव्य पार पाडत कन्या दान करून एक शाही विवाह सोहळा पार पाडत समाजापुढे एक आदर्श घालून दिला आहे. सय्यद कुटुंबियांच्या या आदर्श विवाह सोहळ्याची दखल घेत चिपळूण नगरपरिषदेचे प्रशासक व मुख्याधिकारी अतुल भोसले यांनी सय्यद कुटुंबियांना ऑफिस मध्ये बोलावून विशेष कौतुक केले आहे. या सोहळ्याप्रसंगी नगरपरिषदेचे सर्व कर्मचारी



उपस्थित होते. नगरपरिषदेने केलेल्या सन्मानाबदल सय्यद कुटुंबाने नगरपरिषदेच्या आधिकार्यासह सर्वाचे आभार मानले आहेत.

# भारतीय लष्कराच्या सन्मानार्थ पनवेलमध्ये महाविकास आघाडीची तिरंगा यात्रा

**दैनक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

जम्मू काश्मीर येथील पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर दिले. भारतीय लष्कराचे मनोबल उंचावण्यासाठी पनवेलमध्ये बुधवारी (दि. २१ मे) सकाळी १० वाजता महाविकास आघाडीच्यावतीने तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले नागरिक आणि दहशतवाद्यांविरोधातील कारवाईत शहीद जवानांना श्रध्दांजली वाहण्यात आली. तिरंगा यात्रेत महात्मा गांधी यांच्या वेशभूषेतील व्यक्तीरेखेने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यात्रेच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर तिरंगा यात्रेला सुरुवात झाली. तर पनवेल शहरातून यात्रा काढून काँग्रेस भवन येथे तिरंगा यात्रेचा समारोप करण्यात आला. यावेळी देशभक्तीपर गीतांच्या सुरावटीत भारत मातेचा जयजयकार करण्यात आला. तसेच 'पाकिस्तान मुर्दाबाद- आतंकवाद मुर्दाबाद' म्हणत दहशतवादी कृत्याचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी पदाधिकाऱ्यांच्या हाती 'तिरंग्याखाली चालतो भारत मातेला वंदन करतो, हिंदुस्थान जिंदाबाद, भारत माता की




जय, भूदल नौदल हवाईदल जिंदाबाद, भारतीय सैन्याचे आभार, दहशतवाद्यांचा खात्मा भारतीय सेनेचा अभिनंदन, सैन्याच्या सन्मानार्थ भारतीय नागरिक एकत्र', अशा घोषणा लिहिलेले फलक होते. यावेळी 'हिंदुस्तान जिंदाबाद-पाकिस्तान मुर्दाबाद, दूध मांगोगे तो खीर देंगे काश्मीर मांगोगे तो चीर देंगे' अशा घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी माजी आमदार हुस्नबानू खलीफे, पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सुदाम पाटील, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, शिकापचे ज्येष्ठ नेते काशिनाथ पाटील, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, जिल्हा चिटणीस राजेश केणी, अनिल ढवळे, माजी नगरसेवक लतीफ शेख, नगरसेविका शशिकला सिंग, निर्मला म्हात्रे, युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे, कॅप्टन कलावत,अवचित राऊत, दीपक घरत, नोफिल सय्यद, अमित लोखंडे, जसविंदर सैनि, शशिकांत बांदोडकर,सुरेश पाटील,कांती गंगर, बबन केणी, शिल्पा पाठक, मनोज बिरादार,सुदेशना रायते,जयश्री खटकले, आरती ठाकूर नीता शेनोय, कलावती माळी, माधुरी गोसावी, यतीन देशमुख, अरुण कुंभार, शौकत खान, प्रमोद भगत, शंकर म्हात्रे, विलास फडके, देवेंद्र मडवी,जयेश लोखंडे, चेतन म्हात्रे,रमेश राव, रमेश गोवारी,प्रविण जाधव, विश्वनाथ मते, किरण सोनावणे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पतीनेच सुपारी देवून मारले आपल्या पत्नीला ; 3 अटकेत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

उलवेमध्ये अलवीना किशोरसिंग उर्फ अलवीना अदमली खान (27) या विवाहितेची तिच्याच पतीनेचे सुपारी देऊन हत्या घडवून आणल्याचे उघडकीस आले आहे. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट-2 च्या पथकाने तपास करत मृत विवाहितेचा पती किशोरसिंग राजपूत तसेच हत्येची सुपारी घेणारी महिला अलिशा त्यागी आणि तिची सहकारी डिंपल या तिघांना अटक केली आहे. मात्र, ज्या दोघा मारेकऱ्यांनी अलवीना हिची हत्या केली, ते मारेकरी फरार झाले असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या घटनेतील मृत अलवीना अदमली खान पती किशोरसिंग राजपूत याच्यासोबत उलवे, सेक्टर-5 मधील विजय लक्ष्मी टॉवरमध्ये राहत होती. अलवीना आणि तिचा पती किशोरसिंग दोघेही त्याच परिसरात मेडीकल शॉप चालवत होते. अलवीना मुंबईतील आपल्या नातेवाईकांकडे गेली होती. तेथून ती रात्री 11.45 वाजण्याच्या सुमारास उलवे येथील घरी परतत असताना तिच्या घरापासून अवघ्या 50 मीटर अंतरावर अज्ञात मारेकऱ्याने तिला गाठून तिच्या गळ्यावर धारदार चाकुने वार करुन पलायन केले होते. यात अलवीनाचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेनंतर उलवे पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्याविरुध्द विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली होती. याप्रकरणी गुन्हे शाखा युनिट-2 कडून सुध्दा या प्रकरणाचा समांतर तपास करण्यात येत होता. गुन्हे शाखेने केलेल्या तपासात मृत अलवीना आणि तिचा पती किशोरसिंग या दोघांमध्ये मागील काही वर्षापासून आर्थिक देवाण-घेवाणीतून वाद सुरु असल्याचे तसेच दोघेही घटस्फोट घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सदर माहितीच्या आधारे गुन्हे शाखेने संशयावरुन किशोरसिंग याची उलटतपासणी केली. सुरुवातीला त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली. मात्र, नंतर पोलिसांनी त्याची कसून चौकशी केल्यानंतर त्यानेचे सुपारी देऊन अलवीनाची हत्या घडवून आणल्याची कबुली दिली.

घटस्फोट देत नसल्यामुळे हत्या...

अलवीना हिने किशोरसिंगला व्यवसायासाठी 15 लाख रुपये दिले होते. सदर पैसे ती किशोरसिंग याच्याकडे मागत होती. त्यातच अलवीनाचे दुसऱ्या व्यक्तीसोबत संबंध जुळल्याने किशोरसिंग याने अलवीनाकडे घटस्फोटाची मागणी केली होती. मात्र, पैसे दिल्याशिवाय घटस्फोट देणार नसल्याचे तिने किशोरसिंगला बजावले होते. त्यामुळे या दोघांमध्ये गेल्या काही वर्षापासून वाद सुरु होता. 15 लाख रुपये दिल्यानंतर देखील अलवीना घटस्फोट देणार नसल्याची भिती किशोरसिंग याला होती. त्यामुळेच त्याने सुपारी देऊन अलवीनाची हत्या घडवून आणल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

हत्येसाठी 7 लाखाची सुपारी...

पोलिसांनी केलेल्या तपासात किशोर सिंग याने अलवीनाची हत्या घडवून आणण्यासाठी उलवेत राहणाऱ्या अलिशा त्यागी या महिलेला 7 लाखांची सुपारी दिल्याचे उघडकीस आले आहे. त्यातील 5 लाख रुपये त्याने दिले होते, हत्या झाल्यानंतर उर्वरित 2 लाख रुपये देण्याचा त्यांच्यामध्ये व्यवहार ठरला होता. त्यानुसार अलिशा त्यागी हिने तिची सहकारी डिंपल हिच्या ओळखीतून पंजाब येथून एका मारेकऱ्याला बोलावून घेतले होते. त्यानेच अलवीनावर पाळत ठेवून तिची भररस्त्यात गळा चिरुन हत्या केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. त्यानुसार पोलिसांनी किशोरसिंग राजपूत, अलिशा धनप्रकाश त्यागी (38) आणि डिंपल चरणजीत फत्तेसिंह कौर उर्फ डिंपल (34) या तिघांना अटक केली आहे. तसेच पोलिसांनी फरार दोघा मारेकऱ्यांचा शोध सुरु केला आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांच्यात सामाजिक कार्याची जाणीव अंगभूत - लोकनेते रामशेठ ठाकूर

## भारतीय जनता पार्टी श्री. प्रितम म्हात्रे जनसंपर्क कार्यालयाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उदघाटन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे आणि युवा नेते प्रितम म्हात्रे हे समाजकार्यात अनेक दशके कार्यरत असून त्यांच्यात सामाजिक कार्याची जाणीव अंगभूत आहे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज येथे केले. पनवेल शहरातील गुरुशरणम सोसायटीमध्ये भारतीय जनता पार्टी श्री. प्रितम म्हात्रे जनसंपर्क कार्यालय उभारण्यात आले असून या कार्यालयाचे उदघाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, दिबासाहेबांचे चिरंजीव अतुल पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, माजी नगरसेवक बबन मुकादम, पनवेल मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, कर्नाळा मंडल अध्यक्ष मंगेश वाकडीकर, न्हावे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, रामेश्वर आंग्रे, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, प्रीती जॉर्ज, सुरेखा मोहोकर, सारिका भगत, पुष्पलता मढवी, सीमा घरत, सरस्वती काथारा,



लीना पाटील, रमाकांत म्हात्रे, गौरव कांडपिले, यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जगात सर्वात चांगला नेता म्हणून नाव आहे तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचे सक्षम नेतृत्व करत असल्याचे सांगितले. प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष शेवटी स्वतः असे भाजपचे तत्व आहे, त्यामुळे देशप्रेम प्रथम अशी महत्वाची मूल्य असून भारतीय जनता पक्षात काम करेल त्याला संधी मिळते, असेही त्यांनी नमूद केले. १० मे रोजी प्रवेश झाला आज २२ मे पण तुम्ही थांबलात नाही अवघ्या दहा बारा दिवसात तुम्ही भाजपची मूल्ये आत्मसात केली असे सांगतानाच प्रितम म्हात्रे धडाडीचा कार्यकर्ता आहे त्यामुळे त्याला पुढे मोठी संधी आहे. शेकाप भाजप म्हणून आमची मतभेद झाले पण जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे राजकारण विरहित काम करतात त्यामुळे त्यांच्यासोबत कधीही दुजाभाव झाला नाही., असे त्यांनी अधोरेखित केले. खुर्ची कामा करता असते मानाकरिता नाही, या कार्यालयात मुख्य खुर्ची प्रितम म्हात्रे यांची असणार आहे मात्र ते खुर्चीत न बसता उभे आहेत, असे सांगत कौतुक केले. पनवेलमध्ये मुख्य तीन कार्यालय झाली आहेत, प्रत्येक नगरसेवकाचे व्यक्तिगत कार्यालय आहे.आता आणखी मोठे कार्यालय डेरिवली येथे होत आहे. या कार्यालयातून लोकांची सेवा कायम झाली पाहिजे त्यासाठी सर्वांनी एकदिलाने काम करायचे आहे, असेही त्यांनी सांगितले. जो काम करेल तो पुढे जाईल त्यामुळे आपले कुटुंब सांभाळत पक्षाचे आणि प्रामुख्याने देशहिताचे सर्वांनी काम करावे, असे आवाहनही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले. यावेळी प्रितम म्हात्रे यांनी सर्वांचे स्वागत केले तसेच आपल्या भाषणातून पक्षाचे कार्य अधिक जोमाने करण्याचा मानस व्यक्त केला. यावेळी आमदार विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी याचीही भाषणे झाली. तर प्रास्ताविक माजी नगरसेवक गणेश कडू यांनी केले. यावेळी शेकापचे खांदा कॉलनी अध्यक्ष जयंत भगत, कामोठे शहर प्रमुख संघटक अल्पेश माने, व्यापारी संघटना अध्यक्ष सुरेश खरात, खांदा कॉलनी महिला अध्यक्ष निर्मला गुंडरे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला.

---

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने माजी पंतप्रधान स्व राजीव गांधी यांना विनम्र अभिवादन,

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**
भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. राजीव गांधी यांचे आज स्मुर्ती दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने ताडीवाला रोड माता रमाई चौक आनंद सवाणे यांच्या जनसंपर्क कार्यालय मध्ये स्व राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुणे शहर उपाध्यक्ष आनंद सवाणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले होते, यावेळी आनंद सवाणे यांनी सांगितले राजीव गांधी यांची प्रेरणा घेऊन युवकांमध्ये राष्ट्रप्रेम भावना वाढवावी त्यांनी देशासाठी दिलेले योगदान प्रेरणादायी असून युवकांनी राजकारणात येऊन देशाचे सेवा करावी असे मत व्यक्त केले,




यावेळी चंदन कुमार साह, अजित वाडी, शिवानंद कवडे, मोहम्मद सितारे, महेंद्र कांबळे, शंकर बिराजदार, आदि यावेळी उपस्थित होते

## वनजमिनीच्या रक्षणासाठी संजय सावंत यांची ठाम भूमिका; प्रशासनाचा हलगर्जीपणा उघड

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
अलिबाग मोहे जुरी (वाशूची) येथील सहकारी सेवा संस्था क्रमांक ४०/३ या राखीव वनजमिनीवर अतिक्रमण करून बेकायदेशीरपणे बांधकाम सुरू असूनही वन विभाग आणि महसूल प्रशासन डोळे झाकून बसले आहे, असा थेट आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी केला आहे.

सावंत यांनी आज उपवनसंरक्षक, अलिबाग यांना दिलेल्या तक्रारीत स्पष्टपणे नमूद केले आहे की, २०२२ पासून न्यायालयीन आदेश आणि महसूल विभागाच्या निर्णयांनुसार ही जमीन राखीव व सरकारी मालकीची असल्याचे स्पष्ट असूनही, काही व्यक्ती राजकीय पाठबळावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.या संदर्भात तहसीलदार अलिबाग, उपविभागीय अधिकारी यांचे स्पष्ट आदेश असूनही अद्याप वन विभाग आणि पोलिसांकडून ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे, असे सावंत यांनी निदर्शनास आणून दिले."न्यायालयाने राखीव वनजमिनीच्या संरक्षणाचा आदेश दिला असतानाही अशा जमिनीवर खाजगी अतिक्रमण होणे हे प्रशासनाच्या अपयशाचे ठळक उदाहरण आहे. आम्ही ही लढाई थांबवणार नाही," अशी ठाम भूमिका संजय सावंत यांनी घेतली आहे.सावंत यांनी ही मागणी लावून धरली असून, प्रशासनाने जर त्वरित कारवाई केली नाही, तर हा मुद्दा अधिक उच्च पातळीवर उचलून धरला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## सुलेमान देवळा ग्रामस्थांची कामे रखडली सतत गैरहजर असणाऱ्या ग्रामसेवकावर कारवाई करा ग्रामस्थांची मागणी.

दैनिक युवक आधार
आष्टी प्रतिनिधी
आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे कार्यरत असलेले ग्रामसेवक शिंदे हे गेल्या कित्येक महिन्यापासून गैरहजर असून यामुळे ग्रामस्थांची वेगवेगळ्या प्रकारची कामे रखडली आहे अशा या कामचुकार अधिकार्याची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी सुलेमान देवळा ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. अधिक माहिती अशी की ग्रामसेवक उद्धव शिंदे हे गेली दोन महिन्यांपासूनही जास्त दिवसांपासून सुलेमान देवळा ग्रामस्थांसाठी ते उपलब्ध नाहीत लोकांची कामे रखडली गेली आहेत. कामे घेऊन लोकांना थेट आष्टीला जावे लागत आहेत. सध्या घरकुलांची कामे चालू असून बरेच लोकांची पैसे अभावी कामे रखडली आहेत. अशा या भ्रष्ट अधिकारी ची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी सुलेमान देवळा येथील युवा कार्यकर्ते शिवम घोडके सागर देसाई नंदराज घोडके तुकाराम घोडके यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

## चिखली –कुदळवाडीत काँग्रेसचा पिंपरी चिंचवड विभागीय ओबीसी मेळावा आयोजित

**दैनिक युवक आधार**
**शिवाजी वाघमारे**
**चिखली पुणे**
काँग्रेसचा भव्य दिव्य ओबीसी मेळावा आयोजित केला आहे यि मेळाव्याचे उद्घाटन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री हर्षवर्धन सपकाळ व विधीमंडळाचे गटनेते श्री विजय वडेट्टीवार यांच्या शुभहस्ते होनार आहे प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय काँग्रेस ओबीसी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.जयहिंद, विधान परिषदेचे गटनेते सतेज उर्फ बंटी पाटील, अखिल भारतीय काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुदडे पाटील , कांग्रेस ओबीसी विभागाचे शहराध्यक्ष डॉ.कैलासकदम माजी महापौर कविचंद भाट, कामगार नेते विष्णूपंत नेवाळे, मिलिंद फडतरे महिला शहराध्यक्ष सायली नदे , ओबीसी बारा बलुतेदार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रतापराव गुरव, कांग्रेस ओबीसी विभागाचे शहर निरिक्षक प्रविण जांभळे, ओबीसी संघर्ष समितीचे अनंता कुदळे,राहुल शिवले,मयुर जैसवाल इत्यादी मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत.हा मेळाव्याचे ठिकाण व वेळ :- दिनांक २५/५/२०२५ रविवारी सायंकाळी ५ वाजता ,शिवाजी महाराज चौक,कुदळवाडी पुल, भोसले पेट्रोल पंपाजवळ हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे . या मेळाव्याचे मुख्य संयोजक कांग्रेस ओबीसी विभागाचे शहराध्यक्ष सोमनाथ शेळके हे आहेत

---

## विजय शहा यांचा वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा. :– कॉ.महादेव नागरगोजे

### भारत देशाची लेक कर्नल सोफिया कुरेशी यांचा आम्हाला अभिमान

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** धार्मिक कट्टरता बाळगत महिला सैन्य अधिकाऱ्यांविरोधात अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्या मध्य प्रदेश सरकारचा मंत्री विजय शहा यांच्या वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी. अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ.महादेव नागरगोजे यांनी केली आहे. भारताने ऑपरेशन सिंदुर केल्याा नंतर या मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या कर्नल सोफीया कुरेशी हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग या दोघी रणरागिणी पाकिस्तानातील दहशवाद्यांना ज्या पाकिस्तान २६/११ च्या हल्यापासून आज पर्यंत पोसले असून त्या पाकिस्तान मधील अतिरेक्याचे ९ अड्डे उधवस्त करुन १००( शंभर) अतिरेक्याना यमसदनी पाठवले या मध्ये कर्नल सोफिया कुरेशी यांनी जम्मु काश्मीर मध्ये सर्वाधिक सर्चिंग केले ज्या जम्मु काश्मीर मधील पहेलगाम येथे अतिरेक्याने जात आणि धर्म विचारून २८ देशबांधवांना गोळ्या घालून ठार माराले. त्या मुळे सारे भारतातील माता भगिनीच सिंदुर पुसले गेले. कर्नल साफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान मधील दहशतवादी स्थळे उद्धवस्त करून त्यांनी देशाचे नाव उज्जवल केले. कर्नल सोफिया कुरेशी या रणगिनीचे नाव देशाच्याच नव्हेतर जागतीक पातळीवर नेवून



पोहच केले. त्या रणरागिणी कर्नल सोफीया कुरेशी विषयी मध्य प्रदेशाचे भाजप मंत्री कुंवर विजय शहा यांनी सैन्यातील वरिष्ठ अधिकारी सोफिया कुरेशी यांच्या विषय आक्षेपार्ह विधान केले. त्यानी ऑपरेशन सिंदुर दरम्यान माध्यमाना माहिती देणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी आतंकवाद्यांची बहीण असे संबोधित केले. खंर तर मी असे म्हणेल की कर्नल साफिया कुरेशी या आतंकवाद्यांची बहिण नव्हे तर भारत देशाची शुरवीर बेटी आहे. खरे तर धर्म पाहून गोळ्या चालवणारे आणि धर्मावरून आतंकवाद्यांशी नाते जोडणार एकाच वृतीचे आहेत ही निच वृत्ती भाजपाची आहे. कारण ह्या गंभीर वक्तव्याची दखल मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने घेतली व गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. मात्र या दळभद्री भाजपाच्या सरकारने गंभीर प्रकरणाची कोणती ही दखल घेतली नसुन दिखाऊ पणा करत गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला तरी उच्च न्यायालयाने त्या वर ही गंभीर ताशेरे ओढले आहेत. तरी आक्षेपार्ह विधान करणाऱ्या मंत्र्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा व अशा चुकीचे आक्षेपार्ह विधान करणारे भाजप मंत्री विजय शहा यांचा मी भारतीय कम्यूनिस्ट पक्षाचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून जाहीर तीव्र निषेध करत असून त्यांच्या वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांना भारत देशातून हद्दपार करावे. अशी मागणी कॉ.महादेव नागरगोजे यांनी केली आहे.

## पत्रकार गजानन बानोरे समाजसेवा पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर**
तालुक्यातील नेतंसा येथील छत्रपती संभाजी महाराज जयंती निमीत्त मराठा स्नेहसंवर्धक मंडळाच्या वतीने व रामतीर्थ संस्थानचे वतीने मराठा मेळावा व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन १८ मे रोजी करण्यात आले होते. या सोहळ्याचे उद्घाटक म्हणून केंद्रीय आयुष्य स्वतंत्र प्रभार तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव होते. तर स्वागताध्यक्ष पदी डॉ. राम शिंदे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठा समाज भूषण डॉ. भूषण मापारी, उद्योजक देवेंद्र खडसे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, आ. अमित झनक, ज्योतीताई गणेशपुरे, रा. काँ. प्रदेश उपाध्यक्ष भास्करराव काळे, डॉ. गजानन बाजड, डॉ. अजय पाटील, वसंतराव धाडवे, प्राचार्य वसंतराव अवचार यांच्यासह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते. याप्रसंगी विविध समाजातील सामाजिक कार्य करणार्या महिलांचा व नागरिकांचा मान्यवरांच्या हस्ते शिल्ड व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.
पत्रकार गजानन बानोरे हे गेल्या ३५ वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असल्याबद्दल त्यांना डॉ. राम शिंदे व डॉ. भूषण मापारी यांच्या हस्ते "समाज सेवा" पुरस्काराचे शिल्ड व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन विनोद बोरे तर आभार दिनकर बोडखे यांनी मानले.



## रिपब्लिकन पक्षातर्फे देशभर भारत जिंदाबाद यात्राचे आयोजन: केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची घोषणा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल:(आनंद पवार)**
जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे निरपराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून २८ जणांची क्रूर हत्या केली.या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिन्दुर ऑपरेशन करून पाकव्याप्त काश्मीर मधील दहशतवाद्यांची ठिकाणे उध्वस्त करून १००पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले.देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केल्या प्रमाणे नेमके हेरून दहशतवादी ठिकाणे उध्वस्त केली. दहशतवाद्यांना धडा शिकवला.भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखवून देशाचे संरक्षण करून शत्रू राष्ट्र पाकिस्तानला चांगलाच धडा शिकवला.भारताचे दहशतवादाविरुद्ध युद्ध कायम राहील.भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी पाकिस्तानला आणि दहशतवाद्यांना चांगला धडा शिकवला याबद्दल देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे अभिनंदन करणारी दहशतवादाला पोसणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी भारतीय सैन्याने हाती घेतलेल्या सिन्दुर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षातर्फे देशभर भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात येणार असल्याची घोषणा बुधवारी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी मुंबईत प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सिन्दुर ऑपरेशन यशस्वी करून आपले खंबीर नेतृत्व सिद्ध केले.भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान आहे. भारताचे वायुदल नौदल आणि भूदल यांनी उत्कृष्ट कामगिरी अतुलनीय शौर्य दाखविल्याचे.आपल्या भारतीय सैन्याचा आम्हाला अभिमान असल्याचे प्रतीक म्हणून भारत जिंदाबाद यात्रा रिपब्लिकन पक्ष देशभर काढणार आहे.येत्या दि.२२मे,ते६जून पर्यंत देशभरात सर्व राज्यांत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात आणि तालुक्यात रिपब्लिकन पक्ष भारत जिंदाबाद यात्रा हाती तिरंगा ध्वज घेऊन काढण्यात येणार आहे अशी माहिती ना. रामदास आठवले यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.सर्व रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी ही भारत जिंदाबाद यात्रा आप आपल्या भागात यशस्वी करावी. रिपब्लिकन पक्षाने आयोजित केलेल्या या भारत जिंदाबाद यात्रेत सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले आहे.

## यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमेटीच्यावतीने भव्य "तिरंगा यात्रा" चे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**
**यवतमाळ:-** जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने दिनांक २१ मे २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, यवतमाळ येथे दुपारी १२:०० वाजता "ऑपरेशन सिंदूर" या ऐतिहासिक लष्करी मोहिमेला समर्पित भव्य "तिरंगा यात्रा" चे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात यवतमाळ बस स्थानक चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादनाने झाली. यावेळी देशाचे माजी पंतप्रधान आणि भारतरत्न राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या दूरदृष्टी, विज्ञाननिष्ठा व आधुनिक भारतासाठीच्या योगदानाचा स्मरण करण्यात आला.यानंतर देशाच्या सीमेवर कार्य करणाऱ्या शूर सैनिकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कार समारंभानंतर देशभक्तीपर घोषणांनी दुमदुमलेल्या वातावरणात शहरातून तिरंगा रॅली काढण्यात आली.ही तिरंगा यात्रा "ऑपरेशन सिंदूर" मधील भारतीय लष्कराने दाखवलेल्या अद्वितीय शौर्य, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठेचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. भारतीय लष्कर, नौदल व वायूदल यांच्या पराक्रमाला कृतज्ञतेने वंदन करत, राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याचा काँग्रेस पक्षाचा हा उपक्रम होता.यात्रेत नागरिक, युवक, महिलावर्ग, समाजसेवक, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला. "आपला सहभाग केवळ उपस्थिती नव्हे, तर भारतीय लष्कराच्या शौर्याला दिलेली आदरांजली आहे," असे आवाहन यावेळी करण्यात आले.यावेळी आमदार बाळासाहेब मांगुळकर, माजी मंत्री वसंतराव पुरके, जिल्हाध्यक्ष प्रफुल मानकर, तसेच अशोकराव बोबडे, अरुण राऊत, बबलू देशमुख, संजय ठाकरे, साहेबराव खडसे, अनिल गायकवाड, कृष्णा पुसनाके, शैलेश गुल्हाने, अरविंद वाढोनकर, रमेश भिसणकर, विजय मोघे, जाफर खान, रवी ढोक, राजू चांदेकर, विकी राऊत, छोटू सवयी, नामदेव दोनाडकर, संजय गायधाने, रामराव पवार, राजू पोटे, राजेंद्र तेलंग, अंकुश मुनेश्वर, कुनाल जतकर, किशोर धामंदे, अमय घोडे, मोहन बनकर यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## दृष्टिहीन पुनमने मिळवले दहावीत यश त्याप्रसंगी दिल्या दिव्यांगांनी तिला शुभेच्छा.

**दैनिक युवक आधार**
**रणिता ठाकूर**
**उरण रायगड**
रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात राहत असलेली म्हातावली ग्रामपंचायत मधील दृष्टिहीन पूनम भगवान ससाने हीने मिळवले दहावीच्या परीक्षेत ६०% गुण. घरची परिस्थिती अतिशय बेताची असून, तिच्या डोक्यावर ना बाबांचे छत्र, आई आणि आपल्या मोठ्या बहिणीसह जगत आहे हलाखीचे जीवन. आई घरकाम करून आपल्या दोन मुलींचा उदरनिर्वाह करत आहे. पुनम ससाने च्या यशाची दखल दिव्यांग सामाजिक संघटना उरण ने घेतली आणि तिला शुभेच्छा देण्यासाठी तिच्या घरी गेले. तिला मदत म्हणून जीवनावश्यक वस्तू दिव्यांगांच्या सहकार्याने देण्यात आल्या आणि तिच्या यशाच्या आनंदात सहभागी झाले.यावेळी तिच्या कुटुंबासोबत दिव्यांग सामाजिक संघटनेच्या सदस्यांनी चर्चा करत असताना






असे जाणवले की. पुनम ससाणे ही दृष्टिहीन असून तिने सर्वसामान्यांच्या शाळेत जाऊन ६०% गुण मिळवून यश मिळविले. पुनम ही दृष्टीहीन असूनही तिच्या आत्ताच मेंदूमध्ये गाठी झाल्यामुळे आत्ताच तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे. सदर शस्त्रक्रिया तिच्यावर तीन वेळा झाली आहे. इतके त्रास सहन करत पूनमने आपल्या शिकण्याची जिद्द कायम ठेवत अभ्यास केला. पुनम ला अभ्यासाबरोबरच गायनाची ही आवड आहे. पुनम च्या आई जया ससाणे यांच्यासोबत संवाद साधला पुनम अभ्यासात हुशार आहे त्याचबरोबर तिला गायनाचीही आवड आहे. पुनमला प्रोत्साहन देणारी तिची आई जया ससाणे, तिची मोठी बहीण आरती ससाणे, आणि पूनमच्या आईची मैत्रीण त्यांना जी प्रत्येक वेळी सहकार्य करत आहे त्या वर्षा द्वारकानाथ म्हात्रे. या तिन्ही महिला पूनमला प्रोत्साहन देतात. पुनमची शिकण्याची जिद्द पाहून आईच्या मैत्रिणीने वर्षा म्हात्रे यांनी पूनमच्या डोक्यावर शस्त्रक्रिया झाल्यामुळे तिच्या कुटुंबासहट आपल्या घरी ठेवून घेतले आहे. पुनम ससाणे च्या यशाचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे. सलाम या दृष्टीहीन पूनमच्या जिद्दीला कारण जे सामान्य मुलांना जमत नाही ते या दृष्टीहीन पूनमने करून दाखवलेले आहे. परिस्थिती अतिशय हालाखीची असून आणि डोक्यावर बापाचे छत्र नसतानाही आईने घर काम करून मुलीला जे संस्कार आणि अभ्यास करण्यासाठी प्रेरित केले आहे त्याबद्दल सलाम त्या आईलाही. तिच्या आई सोबत संवाद साधताना आईचे एकच म्हणणे आहे की पुनम चे स्वप्न आहे की तिला खूप शिकायचे आहे त्याचबरोबर गायनात पुढे जायचे आहे तर यासाठी तिला शासनाकडून सहकार्य मिळावे हीच अपेक्षा आहे. तिच्या घरी तिला शुभेच्छा देण्यासाठी दिव्यांग सामाजिक संघटनेचे उपाध्यक्ष राजेंद्र पाटील बरोबर संघटनेचे इतर सदस्य उपस्थित होते तसेच त्यांच्यासोबत सामाजिक कार्यकर्त्या आणि पत्रकार रणिता ठाकूर ही उपस्तित होत्या.

## मोरा-भाऊचा धक्का सागरी प्रवास 26 मे पासून महागणार !

### पावसाळी हंगामात तिकिट दरात 25 रुपयांनी वाढ

**दैनिक युवकआधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**
मोरा(उरण )ते – भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकिट दरात26 मे 2025 पासून पावसाळी हंगामासाठी 25 रुपयांची वाढ करण्यात येणार आहे. पावसाळी हंगामासाठी दरवाढ होणार असल्याने सागरी प्रवास26 मे2025 पासून 80 रुपयांवरुन 105 रुपयांपर्यंत महागणार आहे. दरवर्षी पावसाळी हंगामात मोरा- भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकिट दरात भरमसाठ वाढ केली जाते.यावर्षीही मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेने पावसाळी हंगामासाठी तिकिट दरात80 रुपयां वरुन थेट 105 रुपयांपर्यंत वाढ करण्यात येणार आहे.हाफ तिकिट दरातही 39 रुपयांवरुन 52.50 रुपयांपर्यंत म्हणजे13.50 रुपयांची वाढ करण्यात येणार आहे.ही पावसाळी हंगामासाठी तिकीट दरवाढ26 मे2025 पासूनच31 ऑगस्ट2025 पर्यंत लागु करण्यात येणार असल्याची माहिती मुंबई जल वाहतूक संस्थेचे सेक्रेटरी शराफत मुकादम यांनी दिली.तर पावसाळी हंगामासाठी या तिकिट दरवाढीची मंजुरी मेरिटाईम बोर्डाकडून याआधीच घेण्यात आली असल्याची माहिती मोरा बंदर




निरिक्षक नितीन कोळी यांनी दिली. मोरा–भाऊचा धक्का हा सागरी मार्ग प्रवासी वाहतुकीसाठी अत्यंत फायदेशीर, सुखद आणि शार्टकट म्हणून ओळखला जातो.वाहतुक कोंडीची दगदग नसल्याने या सागरी मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे.त्याशिवाय दरवर्षी पावसाळी हंगामात गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा–अलिबाग , भाऊचा धक्का ते रेवस या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूकही बंद ठेवण्यात येते. त्यामुळे मांडवा–अलिबागकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोरा- भाऊचा धक्का या सागरी मार्गावर गर्दी वाढते. मात्र तिकीट दरवाढीनंतरही प्रवाशांच्या सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ होत नाही.उलट प्रवाशांच्या नशिबात गळक्या प्रवासी बोटी आणि समस्यांचाच अधिक सामना करावा लागत असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

# मारहाण प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: शिवीगाळ करून हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी दीपक म्हात्रे, जितेश कांबळे, कुणाल गायकवाड (तिघे, राहणार कोन) यांच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राजू भाई पटेल हे भावना ऑटो प्युअर इन्फ्रा चिखले फाटा येथे स्टॉक यार्ड इन्चार्ज म्हणून नोकरी करतात. 16 मे रोजी दीपक म्हात्रे व त्यांच्यासोबत दोन इसम गेटवरून स्टॉक यार्ड मध्ये आले आणि त्यांनी सोबत आणलेल्या कागदावर सही करण्यास सांगितली. यावेळी पटेल यांनी मला यात काय लिहिले आहे ते वाचून दाखवा असे सांगितले असता दीपक म्हात्रे व त्यांच्या दोन साथीदारांनी पटेल याना मारहाण केली आणि शिवीगाळ केली. त्यानंतर कंपनीचे सीईओ यांना फोन करून घडलेली घटना सांगत असताना दीपक म्हात्रे व त्याचे साथीदार निघून गेले.

# ढोरकीन येथे इसमाची राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या,

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**



पैठण तालुक्यातील ढोरकीन येथील ४५ वर्षीय व्यक्तीने राहत्या घरात मंगळवारी रात्री गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवारी दि. २१ रोजी उघडकीस आली. विठ्ठल रामकिसन मुळे ( वय ४५ वर्ष रा. ढोरकीन ता. पैठण) असे या घटनेतील मृताचे नाव आहे. याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास विठ्ठल रामकिसन मुळे याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.बुधवारी सकाळी ७ वाजता शेजारील नागरिक व कुटुंबातील सदस्यांना विठ्ठल मुळे हा गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. या घटनेची माहिती पैठण औद्योगिक वसाहत पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत विठ्ठल मुळे यास पैठण येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास तपासून मृत घोषित केले. आत्महत्येचे कारण समजू न शकल्याने पैठण औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत विठ्ठल मुळे यांच्या पार्थिवावर बुधवारी दुपारी दोन वाजता ढोरकीनच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करन्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, जावाई, आई, भावजाई, एक पुतण्या, एक पुतणी व बहिणी असा परिवार आहे. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे, पोलीस उपनिरीक्षक संभाजी झिंजूर्डे, पो. हे. कॉंस्टेबल दिनेश दाभाडे, राहुल महोतमल, गोपनीय विभागाचे कृष्णा उगले, संदीप कोलते आदी पोलीस अधिकारी व कर्मचारी करत आहेत.

# धान्याच्या पेवात अडकलेल्या मुलाची सुखरूप सुटका.

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**



पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या दिन्नापूर या गावात ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाठीमागे जुन्या काळात धान्य साठविण्यासाठी तयार केलेल्या २० ते २५ फूट खोल पेवामध्ये ५ वर्षांचा मुलगा खेळताना अडकला. ही घटना बुधवारी (दि.२१) सकाळी घडली. दरम्यान, या मुलाला सुखरूप बाहेर काढण्यात यश आल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. शिव राजदेव ,वय ५ वर्षे असे मुलाचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील दिन्नापूर येथील शिव राजदेव हा मुलगा खेळताना धान्याच्या पेवामध्ये पडून अडकला. प्रचंड घाबरलेल्या अवस्थेत तो रडत होता.दरम्यान येथून जवळून जात असलेला तरुण त्याच्या रडण्याचा आवाज ऐकून थांबला. त्याने पेवा जवळ जाऊन पाहिले असता मुलगा पेवामध्ये अडकल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याने तात्काळ याची माहिती गावातील सरपंच भीमराव कणसे व नागरिकांना दिली. याची माहिती मिळताच बिडकीन पोलीस ठाण्याचे स पोलीस निरीक्षक निलेश शेळके, बीट जमादार तांगडे घटनास्थळी तत्काळ दाखल झाले. मुलगा अडकलेल्या पेवा मध्ये गावातील तरुण तेजस बारगुजे, कैलास खाटीक दोरीच्या साह्याने उतरले. आणि अडकलेल्या मुलाला सुखरूपपणे बाहेर काढले. त्यानंतर सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

# शिवसेना उबाठा गटाच्या जिल्हा समन्वयक पदी डॉ सिध्दार्थ देवळे साहेब यांची निवड..

## मंगरूळपीर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी केला डॉ. देवळे यांचा सत्कार.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**




वाशिम येथील सुप्रसिध्द हृदयरोगतज्ञ डॉ सिध्दार्थ देवळे साहेब यांची शिवसेना उबाठा वाशिम जिल्हा समन्वयक पदी नियुक्ती झाली. तसेच सर्व शिवसैनिकांमध्ये व जिल्हाभरामध्ये डॉ देवळे साहेबांचे कौतुक होत आहे. यानिमित्ताने मंगरूळपिर तालुक्यातील पदाधिकारी यांनी त्यांचा २१ मे रोजी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण सत्कार श्री भागवतराव शिंदे तालुका उपाध्यक्ष आणि वनोजा येथील डॉ सुनील पाटील राऊत यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी रत्नागिरी येथील निर्मलाताई भिडे महाविद्यालय चे प्राचार्य श्री साबळे सर यांची उपस्थिती होती.

# धर्मवीर कामगार सेनेच्या संस्थापक अध्यक्षा प्रियांका गाडे यांच्यामुळे महिलेला मिळाला न्याय

## व्हाईट लॉटस इंटरनॅशनल हॉस्पिटल अखेर नमले

**दैनिक युवक आधार**
**पनवेल / प्रतिनिधी**

रोडपाली येथील व्हाईट लॉटस इंटरनॅशनल हॉस्पिटलमध्ये व्यवस्थापन मंडळाकडून कर्मचाऱ्यांचा छळ होत असल्याच्या तक्रारी धर्मवीर कामगार संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा प्रियांका गाडे यांच्याकडे येत होत्या. त्यानंतर त्यांनी रुग्णालय प्रशासन, पोलिस ठाण्याशी संपर्क साधूनही लक्ष दिले गेले नाही. याप्रकरणी पोलिस प्रशासनाने तत्काळ दखल घ्यावी अशी मागणी प्रियांका गाडे यांनी पोलिस आयुक्त तसेच कळंबोली पोलिसांकडे केली होती. तक्रारी आल्यानंतर



रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रितेश बिजरोई यांची भेट घेतली असता आम्ही विषय हाताळतो असे त्यांनी सांगितले होते. तीन महिने उलटूनही कर्मचा-यांचे पगार भेटत नाही. हॉस्पिटल पेशंटकडून जास्तीचे बिल घेतले जाते. हॉस्पिटलच्या या गैरप्रकाराविरोधात तेथील कर्मचारी अर्चना खरात यांनी आवाज उठविण्याचा प्रयत्न केला. तर त्यांनाच राजीनामा देण्यास सांगितले. मानसिक छळ केला. जातीवाचक शिवीगाळ केली. पैसे वसूल करण्यासाठी हॉस्पिटल कोणत्याही थराला जाउ शकते. यात एखाद्याचा जीव गेल्यावर प्रशासन जागे होईल का असा प्रश्न उपस्थित होतो अशी तक्रार प्रियांका गाडे यांनी समाजमाध्यमांव्दारे केली होती. मंगळवारी २० मे ला प्रियांका गाडे या आपल्या सहका-यांसह हॉस्पिटल प्रशासनाला जाब विचारण्यासाठी गेले असता त्याठिकाणी हॉस्पिटल व्यवस्थापन यांनी लगेचच कळंबोली पोलिसांना संपर्क केला. एरव्ही कायम उशिरा पोहचणारे पोलीस यावेळी मात्र तात्काळ उपस्थित झाले. त्यानंतर झालेल्या चर्चेत हॉस्पिटल व्यवस्थापनाने तक्रारदार महिलेच्या अटी मान्य केल्या. धर्मवीर सेनेच्या प्रियांका गाडे यांच्यामुळे योग्य न्याय मिळाला त्याबद्दल महिलेने प्रियांका गाडे यांचे आभार व्यक्त केले. यावेळी झालेल्या चर्चेत विजय पवार यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# ना.संजय सिरसाट यांच्या नागरी सत्कार सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहा.:- प्रा.विलास जावळे

**दैनिक युवक आधार**



**पाटोदा(प्रतिनिधी)-** राज्याचे सामाजिक न्यायमंत्री व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय सिरसाट यांच्या नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन माजलगाव येथे करण्यात आले असून, या कार्यक्रमाला पाटोदा तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते प्रा.विलास जावळे यांनी केले आहे. हा नागरी सत्कार सोहळा शुक्रवार दिनांक २४ मे २०२५ रोजी दुपारी ४:०० वाजता माजलगाव येथील जूना मोंढा मैदानात पार पडणार आहे. ना.सिरसाट यांनी सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांच्या गौरवासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास नामवंत नेत्यांची उपस्थिती लाभणार असून, नेते बाबुराव पोटभरे, आमदार प्रकाश (दादा) सोळंके, आमदार धनंजय मुंडे (डीएम), आमदार सुरेश(आण्णा)धस आमदार विजयसिंह पंडित (राजे) तसेच शिवसेना नेत्या हर्षदा सिरसाट हे प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी होणार आहेत. कार्यक्रमात विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बहुजन समाजातील युवक, महिला व नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन एकात्मतेचा संदेश द्यावा. असे आवाहन प्रा.विलास जावळे यांनी केले आहे.

# मालेगाव पोलिस स्टेशनचे दबंग ठाणेदार संजय चौधरी यांनी केली गांजा विक्रेत्यावर विशेष कारवाई.

## आरोपी हनवतखेडा येथील महिलाचा समावेश ...

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे..**




पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे साहेब वाशिम यांनी वाशिम जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात आमली पदार्थ विरोधी कारवाई करण्याच्या सूचना सर्व ठाणेदारांना दिल्या होत्या त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे मालेगावचे अभ्यासु,दबंग ठाणेदारश्री.संजय चौधरी यांनी मालेगाव पोलिसांचे एक पथक तयार करून त्यानुसार आमली पदार्था विरोधी कारवाईच्या सूचना दिल्या होत्या त्यानुसार गोपनीय बातमीदार नेमण्यात आले होते,१९/०५/२०२५ रोजी बातमी तारांकडून माहिती मिळाली की अकोला येथून मेडसी येथे एक महिला आणि एक मुलगा गांजा विकण्यासाठी घेऊन येत आहेत, त्यानुसार याबाबत पोलीस अधीक्षक वाशिम,अप्पर पोलीस अधीक्षक वाशिम,सहाय्यक पोलीस अधीक्षक उपविभाग वाशिम यांना सदरची माहिती देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली छापा कारवाईसाठी पथक नेमण्यात आले व पोलीस उपनिरीक्षक संतोष हिंगे,पोलीस उपनिरीक्षक रवी सैबेवार,महिला पोलीस उपनिरीक्षक शिल्पा लोंढे, पोलीस हवालदार सुनील पवार,पोलीस हवालदार शिवाजी काळे ना.पोलीस कॉन्स्टेबल विजेंद्र इंगोले,पोलीस कॉन्स्टेबल जयशंकर पाटील, पोलीस कॉन्स्टेबल अमोल पवार,पोलीस कॉन्स्टेबल गणेश मेटांगळे असे पथक नेमण्यात आले व त्यांना दबंग ठाणेदार संजय चौधरी यांनी कारवाईच्या सुचना दिल्या होत्या,त्यानुसार सदर पथकाने सापळा रचून अकोला मेडशी बायपास वरील मेडशी बस स्थानक येथे आरोपी महिला नामे मनकरणी मोहन जाधव वय ६० वर्षे राहणार हनवतखेडा तालुका मालेगाव जिल्हा वाशिम आणि तिच्यासोबत आरोपी अभिषेक गजानन ठाकरे वय २० वर्षे राहणार खेर्डा.तालुका मंगरूळपीर

**मालेगाव पोलिस स्टेशनचे दबंग ठाणेदार संजय चौधरी या हिऱ्यांनी त्यांच्या टिमसह दोन आरोपी यांच्याकडुन १,३८,०००/- चा जप्त केला मुद्देमाल. मालेगावकरांच्यावतीने होत आहे विशेष कौतुक..**

जिल्हा वाशिम यांना ११.५००कि ग्रॅ.चा गांजा किंमत १,३८०००/-रुपेय सह पकडला आणि आरोपींना गांजासह ताब्यात घेतले,घटनास्थळ पंचनामा कारवाई व इतर कायदेशीर तरतुदी पूर्ण करून मालेगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.न.२७०/२०२५ कलम ८(सि).२० एनडीपीएस कायदा १९८५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास ठाणेदार संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक दिलीप रहाटे करत आहेत.सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे साहेब,मा.अप्पर पोलीस अधीक्षक लता फड मॅडम सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री.नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक संतोष हिंगे,पोलीस उपनिरीक्षक रवी सैबेवार,महिला पोलीस उपनिरीक्षक शिल्पा लोंढे मॅडम, पोलीस हवालदार सुनील पवार, पोलीस हवालदार शिवाजी काळे, ना.पोलीस कॉन्स्टेबल विजेंद्र इंगोले,पोलीस कॉन्स्टेबल जयशंकर पाटील,पोलीस कॉन्स्टेबल अमोल पवार,पोलीस कॉन्स्टेबल गणेश मेटांगळे यांनी सदरची छापा कारवाई केली आहे.

# जीएमआरटी ग्लोबल सायन्स एक्झिबिशन मध्ये समर्थ च्या विद्यार्थ्यांचे यश

## विविध प्रकल्प गटांमधून सहा पारिदतोषिके प्राप्त

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ देवेंद्र ओव्हाळ**

नॅशनल सेंटर फॉर रेडिओ अस्ट्रोफिजिक्स टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च,पुणे आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जीएमआरटी वर्चुअल सायन्स डे २०२५ पारितोषिक वितरण सोहळा एन सी आर ए ऑडिटोरियम टी आय एफ आर पुणे विद्यापीठ कॅम्पस मध्ये नुकताच संपन्न झाला. हे प्रदर्शन जीएमआरटी मार्फत भरवण्यात येणारे मोठे ऑनलाईन विज्ञान प्रदर्शन असून भारतातून सुमारे साडेचारशे हून अधिक शाळा व महाविद्यालयांतून १७७५ विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट,बेल्हे या महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील मयूर देशमुख अक्षय कासार आणि अंकिता दिवेकर या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ऑटो सर्व्हेअर अँड सिव्हि बोट या प्रकल्पाचा बीई,एम ई आणि एम एस्सी या गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याची माहिती प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांनी दिली. तसेच वैष्णवी म्हस्के,सानिका ढोबळे,निकिता काळे आणि श्रुती शिंदे यांनी तयार केलेल्या मल्टीफंक्शनल इको फ्रेंडली ॲग्रो मशीन या प्रकल्पास द्वितीय क्रमांक तर अथर्व पोखरकर,यश शिंदे,निकिता सरोदे या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या जनरेट इलेक्ट्रिसिटी फ्रॉम वेस्ट मटेरियल अन्ड कंट्रोल एअर अन्ड वॉटर पॉल्युशन या प्रकल्पास उत्तेजनार्थ व सिद्धार्थ वाघ,दिनेश थोरात,अपूर्वा पोखरकर यांनी तयार केलेल्या आरएफआय डी बेस पोल्युशन कंट्रोल अल्गोरिदम फॉर इमिशन्स इन सिटीज युजिंग आयओटी या या प्रकल्पास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. त्याचप्रमाणे मोस्ट व्ह्यूड अँड रेटेड प्रोजेक्ट या कॅटेगिरी मध्ये कम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील पायल भगत व हरीश धशरवार यांनी तयार केलेल्या ड्रोन डिटेक्शन युजिंग आर्टिफिशियल इंटेलिजन्स या प्रकल्पास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याची माहिती कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.स्नेहा शेगर यांनी दिली. एन सी आर ए,टी आय एफ आर सेंटर डायरेक्टर डॉ.यशवंत गुप्ता,आऊट्रीच कमिटी प्रमुख डॉ.दिव्या ओबेरॉय,जीएमआरटी सायन्स डे चे प्रमुख डॉ.ईश्वरचंद्र,जीएमआरटी सायन्स डे चे सहप्रमुख डॉ.जे के सोळंकी व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेजचे अध्यक्ष निलेश छाडावेलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. हे प्रकल्प तयार करण्यासाठी समर्थ अभियांत्रिकीच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाचे विभागप्रमुख प्रा.निर्मल कोठारी,कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. स्नेहा शेगर,आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग इंजीनियरिंग विभागप्रमुख प्रा.शुभम शेळके,प्रा. प्रियांका लोखंडे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत,प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदिप गाडेकर तसेच संकुलातील सर्व विभागाचे प्राचार्य,विभागप्रमुख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.



# रायगडच्या सुपुत्राने शास्त्रीय गायनातून देशभरात गाजवले कर्तृत्व; देशभर शास्त्रीय संगीतातील प्रचार आणि प्रसारास हातभार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

रायगड जिल्ह्याचे सुपुत्र आणि प्रख्यात शास्त्रीय गायक पं. उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांनी आपल्या सुरेल, सर्जनशील आणि शास्त्रशुद्ध गायकीच्या माध्यमातून देशभरातील श्रोत्यांच्या हृदयात अढळ स्थान निर्माण केले आहे. गेल्या चार दिवसांत त्यांनी सलग चार राज्यस्तरीय शास्त्रीय संगीत महोत्सवांमध्ये सहभाग घेत, महाराष्ट्राबाहेर कर्नाटक, बेळगाव, हैद्राबाद आणि बंगलोर येथे आपल्या गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. रायगड जिल्हा संस्कृतीनिष्ठ भूमीतील कलाकार पं. उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांनी आपल्या सर्जनशील गायनाने संपूर्ण देशभरात शास्त्रीय संगीतातील अध्वर्यू म्हणून स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांचे गायन हे केवळ कलात्मक सादरीकरणापुरते मर्यादित न राहता, शास्त्रीय संगीतातील मूलतत्त्वांचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्यही ते प्रभावीपणे करत आहेत. त्याच अनुषंगाने त्यांनी




वाटचाल करताना चार दिवसात महाराष्ट्र राज्याबाहेर विविध ठिकाणी सलग चार शास्त्रीय गायनाच्या महोत्सवात गायन करत परराज्यातीलही रसिकांची मने जिंकली. कर्नाटक, बेळगाव, हैद्राबाद, बँगलोर येथे झालेल्या शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमात त्यांनी आपल्या ओजस्वी आणि भावपूर्ण गायनातून विविध रागांतील तंत्र, बंदिशी, आणि विशिष्ट घराण्याची गायकी सादर करत त्यांनी उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सादरीकरणास संगीतप्रेमी, विद्वान आणि अभ्यासकांकडून विशेष दाद मिळाली. पं. उमेश चौधरी हे गेल्या ३० वर्षांपासून संगीत क्षेत्रात सक्रिय असून, त्यांनी देशातील अनेक प्रतिष्ठित मंचांवर शास्त्रीय संगीताचे सादरीकरण केले आहे. शिवाय, तरुण पिढीमध्ये संगीताबद्दल जागरूकता निर्माण व्हावी म्हणून ते सातत्याने कार्यरत आहेत.शास्त्रीय संगीत हे भारताचे सांस्कृतिक वैभव असून, ते नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे कार्य पं. उमेश चौधरी यांनी आपल्या समर्पित सेवेतून साधले आहे. रायगडच्या मातीतून जन्मलेला हा कलाकार पिढीसाठी प्रेरणास्थान बनला आहे. कर्नाटक मधील मुडलगी येथे शिवरुद्र स्वामी मठ, बेळगाव येथील बी. आर. कडाळस्कर ट्रस्ट तर्फे केकणवाडी आयुर्वेदिक कॉलेज ऑडिटोरियम, हैद्राबाद येथे मॅस्ट्रो म्युझिक अकॅडमीवतीने, आणि बंगलोर येथे धून म्युझिक अकॅडमीच्यावतीने गायन महोत्सव आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्र ते कर्नाटक, बेळगाव, हैद्राबाद, बंगलोर असा दूरवरचा प्रवास करत त्यांनी चार दिवसात चार महोत्सवात आपले शास्त्रशुद्ध शास्त्रीय गायन सादर केले. लांबचा प्रवास आणि त्यातून वातावरण बदल असला कि आवाजातही बदल होण्याची भीती असते मात्र पं. उमेश चौधरी यांनी आपल्या शैलीत तिळमात्र बदल केला नाही उलट त्यात अधिक आत्मीयता आणि गहिवर अनुभवायला मिळाला. त्यांच्या गायनाने वातावरण प्रफुल्लित आणि भारावून गेले होते. चार सलग कार्यक्रमांमधून त्यांनी केवळ संगीत सादर केले नाही, तर शास्त्रीय संगीताचा प्रसार करत भारतीय सांस्कृतिक वारशाची ज्योत प्रज्वलित ठेवली आहे. यानिमिताने शिवरुद्र स्वामी मठाचे श्रीधर स्वामी यांनी त्यांना आशीर्वाद दिले तसेच पुढील वर्षीही कार्यक्रमाला येण्याचे आमंत्रित केले. त्याचबरोबरीने संगीत क्षेत्रातील दिग्गज असलेले गुरुराज कुलकर्णी, प्रसाद पंडित, वंदना कट्टी, संजय देशपांडे, श्रीधर कुलकर्णी यांसारख्या अनेक मान्यवरांनी पं. उमेश चौधरी यांच्या गायनशैलीचे कौतुक केले. यावेळी झालेल्या गायनासाठी पं. उमेश चौधरी यांना तबल्याबर पं. विनायक नाईक, विजय रेड्डी, पं. निषाद पवार, सूरज गोंधळी यांनी हार्मोनियमवर पं. सुधांशु कुलकर्णी, मंदार दीक्षित, योगेश रामदास, सुर्या उपाध्याय, यादवेंद्र पुजारी यांची संगीत साथ लाभली.

# बालविवाह व बालमजूरी आढळून आल्यास कडक कारवाई करण्याचे दिली निर्देश :- तहसिलदार वैशाली पाटील

**दैनिक युवक आधार**
**मारुती सत्रे**
**बीड आष्टी प्रतिनिधी**

तालुक्यात बालविवाहांच्या घटना घडू नये अल्पवयीन मुलांकडून काम करुन न घेता बालमजूरी थांबावी यासाठी प्रबोधन, जनजागृती करत असतांना कठोर उपाययोजना कराव्यात त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे,अशा प्रकरणातील जबाबदार व्यक्ती व दोषींवर कडक कारवाई करा, असे निर्देश आष्टीचे तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिले आहेत. या पार्श्वभूमीवर आष्टी तालुक्यात बालविवाह मुक्त व बालमजूरी यासाठी आष्टी तालुक्याची बालसंरक्षण समितीची बैठक तहसिलदार वैशाली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तहसील



कार्यालयात बुधवार दि २१ में रोजी सकाळी १२ वाजता संपन्न झाली. यावेळी पुढे त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की शिक्षण विभाग, पंचायत विभाग, आरोग्य विभाग, गाव पातळीवरील पोलीस पाटील, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यासारखे कर्मचारी यांची बालविवाह रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्यासाठी बाल कामगार, शाळा माध्य, मुले यांबाबतही जणजागृती करण्यात यावी, ग्रामस्तरावर ग्राम कृती दल स्थापन करण्यात यावे.ग्राम बाल संरक्षण समिती, शाळा व्यवस्थापन समिती यासारख्या समित्यांमधील सदस्य ही महत्त्वाचे योगदान देऊ शकतात. बालविवाहाच्या घटना घडल्यास त्यास जबाबदार व्यक्तिंवर कारवाई होणे आवश्यक आहे. नागरिकांनी आपल्या

**मंगल कार्यालय चालकांनी पुराव्यानिशी लग्न बुकींग करावी.**

तालुक्यातील सर्व विवाह मंगल कार्यालये, फंक्शन हॉल चालकांनी वधू आणि वर यांच्या जन्मासंबंधी पुरावा म्हणून आधार कार्ड न घेता निर्गम उतारा किंवा शाळेचा दाखला पुरावा घेण्यात यावा तेव्हाच विवाहाची बुकींग करून घ्यावी अन्यथा बाल विवाह झाल्यास संबंधित मंगल कार्यालय चालक व बॅन्ड वाजंत्री वाले,आचारी आणि इतर व्यक्तीनवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश तहसीलदार वैशाली पाटील यांनी दिले.


सभोवताली कुठे बालविवाह होत असल्यास त्याची माहिती १०९८ व ११२ या टोल फ्रि क्रमांकावर द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल, असेही तहसीलदार पाटील यांनी बोलताना सांगितले. या बैठकीस बाल संरक्षण समितीचे सचिव बाल एकात्मिक विकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर,बाल संरक्षण समीतीचे सदस्य पोलिस निरीक्षक शरद भुतेकर,आरोग्य विभागाचे प्रतिनिधी डॉ पवन इंगोले,स्थानिक सामाजिक प्रतिनिधी अविनाश कदम, अनिरुद्ध धर्माधिकारी, विकास मस्के,बाल प्रतिनिधी प्रतिक अशोक पवार,ओम वाल्हेकर, शिक्षण विभागाचे सोनवणे,बाल संरक्षण कक्ष प्रतिनिधी राजेंद्र गळगटे आदी संरक्षण समितीचे सदस्य उपस्थित होते.

# चिंकुद्रा येथील डॉ ओमकार संतोष मोटे यांनी बी.ए.एम.एस.पदवी प्राप्त केल्याने नागरी सत्कार..

**दैनिक युवक आधार**
**संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**

तुळजापूर तालुक्यातील चिंकुद्रा गावचे सुपुत्र डॉ.ओमकार संतोष मोटे यांनी बी. ए.एम.एस.पदवी प्राप्त केल्याने तसेच चिंकुद्रा येथील श्री. भैरवनाथ महाविद्यालयातील दहावी मध्ये पास झालेल्या विद्यार्थिनी कु.समीक्षा सतीश गायकवाड यांनी (९२.४०%) टक्के कु साक्षी सोमनाथ कानडे (८६.४०%) टक्के कु.धिरज भैरवनाथ गायकवाड (८५.३०%) टक्के व तसेच बारावी मध्ये पास झालेले विद्यार्थी कु.संयोगिता भगवंत जोगी यांनी ( ८३.६७%) टक्के कु. प्रार्थना ज्योतिराम मोटे ( ८३.६७%) टक्के कु.अपेक्षा सतीश गायकवाड ( ८२.३३) टक्के कु. ऋतुजा ज्योतीराम मोटे (८१.५०% ) टक्के कु. ज्योतीराम जयराम गरड ( ८१.३३% टक्के घेतलेल्या विद्यार्थ्यांचे व पालकांच सत्कार चिंकुद्रा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या व तसेच चिंकुद्रा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आले तसेच यावेळी विशेष सत्कार नळदुर्ग शहर शिवसेनेच्या वतीने डॉ .ओमकार संतोष मोटे यांचे सत्कार माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण पोलीस





उपनिरीक्षक प्रदीप सिंग ठाकूर नळदुर्ग शहर प्रमुख संतोष पुदाले शाम कनकधर नेताजी महाबोले यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी चिंकुद्रा गावचे उपसरपंच कु.सुकेशनी संजय मोटे माजी सरपंच राजाभाऊ गरड प्रा.संजय मोटे प्रा.बालाजी गरड महादेव जाधव ज्योतीराम मोटे युवा सेना सहदेव गरड दादा मोटे भैरवनाथ गरड शंकर मोटे शाहूराज गायकवाड तसेच गावातील जष्ठ नागरिक मान्यवर उपस्थित होते यावेळी शिवसेना शाखा प्रमुख संतोष नागनाथ मोटे यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले

## कारच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

भरधाव वेगाने आलेल्या कारने पादचाऱ्याला धडक दिली. यात ओम गंगाराम तांबे (कामोठे) याचा मृत्यू झाला तर दुसऱ्या दोन कारला दिलेल्या धडकेत कारचे नुकसान झाले. या अपघात प्रकरणी अनिकेत राजेंद्र नलावडे (तळोजा) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्वेश त्रिपाठी हे कोपरखैरणे येथे राहत असून ते कामावर गेले होते. त्यांची कार रोडपाली सिग्नल ते पुरुषार्थ ब्रिजकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला रोडपालीसमोर पार्क केली होती. यावेळी त्यांच्या कारच्या समोर नानजीभाई पटेल यांची कार पार्क केली होती. यावेळी आणखी एक कार रोडपाली सिग्नलकडून वेगाने आली आणि रस्त्याच्या कडेने चालणाऱ्या ओम तांबे याला धडक दिली. या धडकेत त्याचा मृत्यू झाला.

## फार्महाऊसमधील तरण तलावात बालकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

तालुक्यातील दुन्द्रेपाडा येथील एका फार्महाऊसमधील तरण तलावात तीन वर्षांच्या बालकाचा बुडून मृत्यू झाला आहे. रुद्र असे या बालकाचे नाव असून या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. विशाल बोदडे (बुलढाणा) आणि त्यांची पत्नी पूर्वी फार्महाऊसमध्ये केअरटेकर म्हणून काम करतात. त्यांच्या मुलाचे रुद्र, विशाल बाहेर गेले होते. त्यांची पत्नी आणि मुलगा फार्महाऊसवर होते. सायंकाळी सहा ते सातच्या सुमारास रुद्र खेळता खेळता तरण तलावात पडला आणि त्यातच त्याचा बुडून मृत्यू झाला. ही घटना विशाल यांच्या पत्नीच्या ध्यानात उशिरा आली.

## संचालक असल्याचे भासवून चॅटिंग, 75 लाखांचा गंडा

**दैनिक युवक अधव**
**पनवेल, (वार्ताहर)**

युवा किसान फार्मर कंपनीची 75 लाखांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे. कंपनीचे आर्थिक व्यवहार सांभाळणाऱ्या कामगाराला अज्ञाताने चॅटिंग करून तो डायरेक्टर असल्याचे भासवून फसवणूक केली आहे. कंपनीच्या कामोठे परिसरात राहणाऱ्या कामगारासोबत हा प्रकार घडला. हा कामगार रविवारी सुटी असल्याने घरी असताना त्यांना – अनोळखी नंबरवरून व्हॉट्सअॅप मेसेज आला होता. त्या नंबरच्या प्रोफाइलवर त्यांच्या डायरेक्टरचा फोटो होता तसेच मेसेज करणाऱ्याने तो डायरेक्टर असून, त्यांचा नवीन नंबर असल्याचे सांगितले. दुसऱ्या दिवशी त्या तोतयाने कामगाराला मेसेज करून कामानिमित्त बाहेर असल्याचे सांगितले. शिवाय कंपनीच्या बँक खात्यातून 75 लाख रुपये पाठवण्यास सांगितले. त्यांच्या सांगण्यावरून कामगाराने नमूद खात्यात ही रक्कम पाठवली. कंपनीचे मूळ डायरेक्टर श्रीकांत कोठावळे यांना खात्यातून पैसे पाठवल्याचे लक्षात आले. त्यानंतर याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## भरघोस परताव्याचे आमिष दाखवून एक कोटीची फसवणूक


**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

सट्टा बाजारात गुंतवणूक करा आणि भरघोस परतावा मिळवा अशा आशयाच्या जाहिरातीला बळी पडून खारघर येथील एका व्यक्तीने एक कोटी 10 लाख 32 हजार रुपये गमावले आहेत. याबाबत सायबर पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
गुंतवणूक करा अल्पवधीत भरघोस नफा कमवा अशा आशयची जाहिरात खारघर येथे राहणाऱ्या एका व्यक्तीने समाज माध्यमावर पाहिली आणि सहज म्हणून त्यांनी त्या जाहिरात लिंकवर क्लिक केले. क्लिक करताच त्यांचा समावेश एका व्हाट्स अँप समूहात झाला त्या ठिकाणी अल्पवधीत कमी गुंतवणूकीवर भरघोस नफा कसा कमावावा याचे मार्गदर्शन केले जात होते. हे सर्व खरे वाटून फिर्यादी यांनी 6 एप्रिल ते 19 मे दरम्यान एक कोटी 10 लाख 32 हजार रुपयांची गुंतवणूक केली. या गुंतवणुकीवर चार पट परतावा अॅपवर दिसत होता. मात्र प्रत्यक्षात बँक खात्यात ही रक्कम वळती होत नव्हती. वारंवार मागणी करूनही पैसे मिळत नसल्याने आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आले.

## रोहीत्राचा उडालेला फ्युज टाकताना विजेचा धक्का लागून तरूण शेतकऱ्यांचा मृत्यु.

### लोहगांव येथील आठवड्यात दुसरी दुर्दैवी घटना.

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**



शेतातील महावितरणच्या रोहीत्राचा उडालेला फ्युज टाकताना विजेचा जोरदार धक्का लागून तरूण शेतकऱ्यांचा अनैसर्गिक करूण अंत झाला.संजय मुरलीधर इथापे असे या मयत शेतकऱ्याचे नाव आहे.लोहगांव परिसरातली आठवड्यात ही दुसरी दूर्दैवी घटना असून दोन दिवसांपूर्वी याच पावसात उडालेल्या पालाची खुटी ठोकण्यासाठी राहुटीच्या बाहेर आलेल्या मेंढपाळ महिलेच्या अंगावर विज पडून जागेवर मृत्यू झाल्याचे तोच अनैसर्गिक मयताची ही दुसरी खबर आहे. याबाबत सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पैठण तालुक्यातील लोहगांव येथील तरूण शेतकरी संजय मुरलीधर इथापे,वय ५५ हे आदल्या दिवशी झालेल्या पावसामुळे मावसगव्हाण शिवारात गट.नं.५३ मधील गवळ्या शिवेवरील महावितरणच्या रोहीत्राचा फ्युज गेल्याने बुधवार दि.२१ रोजी सकाळी साडे आठ वाजेच्या दरम्यान शेतात तणनाशक फवारणीसाठी पाण्याची आवश्यकता असल्याने शेतातील महावितरणच्या रोहीत्राचा उडालेला फ्युज टाकत असताना जोरदार विजेचा धक्का लागून जागेवर कोसळले गंभीर अवस्थेत ग्रामस्थांनी बिडकीन ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ.आसमा शेख यांनी तपासून मृत घोषित करून शव विच्छेदन करण्यात आले.सदर मयताच्या पश्चात पत्नी, दोन मुली,एक मुलगा असा परिवार असल्याचे नातेवाईकांनी फोन वरून सांगितले. घटनेची माहिती मिळता बिडकीन पोलिस ठाण्याचे स.पो.नि.निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार सोमनाथ तांगडे हे अधिक तपास करत असून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# जगभरातील शेअर बाजारात विक्रीचा मारा

### सेन्सेक्स ६४५ अंकांनी गडगडला




### अमेरिकन बाँड उत्पन्नात वाढ; एफएमसीजी, आयटी शेअर्सची जोरदार विक्री

**मुंबई :** वाढत्या बाँड उत्पन्नामुळे आणि अमेरिकेच्या कर्जाच्या चिंतेमुळे जागतिक शेअर बाजारातील घसरणीमुळे भारतीय शेअर बाजारातही विक्रीचा मारा झाला. आयटी, तेल आणि एफएमसीजी शेअर्समध्ये विक्री झाल्याने सेन्सेक्स ६४५ अंकांनी गडगडला तर निफ्टी २४,६०० च्या पातळीवर आला.

बीएसई सेन्सेक्स ६४४.६४ अंकांनी किंवा ०.७९ टक्क्यांनी घसरून ८०,९५१.९९ वर बंद झाला. त्यातील २७ घटक कंपन्यांच्या समभागात घसरण झाली. निर्देशांक सकाळी घसरून उघडला आणि आणखी १,१०६.७१ अंकांनी किंवा १.३५ टक्क्यांनी घसरून ८०,४८९.९२ च्या किमान पातळीवर पोहोचला होता. अशाच प्रकारे एनएसई निफ्टी २०३.७५ अंकांनी किंवा ०.८२ टक्क्यांनी घसरून २४,६०९.७० वर बंद झाला. सेन्सेक्स कंपन्यांपैकी, महिंद्रा अँड महिंद्रा, बजाज फिनसर्व्ह, टेक महिंद्रा, पॉवर ग्रिड, आयटीसी, हिंदुस्तान युनिलिव्हर, रिलायन्स इंडस्ट्रीज आणि मारुतीचे समभाग सर्वात जास्त घसरले. तर इंडसइंड बँक, भारती एअरटेल आणि अल्ट्राटेक सिमेंट यांचे समभाग वधारले.

प्रस्तावित बजेट विधेयकामुळे राष्ट्रीय कर्जात लक्षणीय वाढ होऊ शकते. त्यामुळे दीर्घकालीन बाँड मागणी मंदावल्याने अमेरिकेच्या ट्रेझरी उत्पन्नात वाढ होऊ शकते. या अमेरिकन राजकोषीय चिंतेमुळे प्रमुख निर्देशांकांमध्ये घसरण झाली. या दबावात भर घालत एका प्रमुख पतमापन संस्थेने अमेरिकन 'क्रेडिट आऊटलूक'चे 'डाऊनग्रेड' केल्याने आशियाई बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणात विक्रीचा मारा झाला, असे जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर म्हणाले.

अमेरिकन बाँड उत्पन्न ५ टक्क्यांपर्यंत पोहोचले तर जपानी बाँड उत्पन्न ३.५ टक्क्यांपर्यंत वाढले. त्यामुळे धोकादायक मालमत्ता आणि भारतासारख्या उदयोन्मुख शेअर बाजारांमध्ये विक्री झाली. अमेरिकन आणि जपानी बाँड उत्पन्नात तीव्र वाढ झाल्याने गुंतवणूकदारांना इक्विटींकडे जोखीम घेण्यास भाग पाडल्यानंतर भारतीय शेअर बाजारांनी त्यांच्या जागतिक बाजारांचे अनुसरण केले आणि मोठ्या प्रमाणशत विक्री झाली, असे मेहता इक्विटीज लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष (संशोधन) प्रशांत तापसे म्हणाले. आशियाई बाजारपेठेत दक्षिण कोरियाचा कोस्पी, जपानचा निक्केई २२५ निर्देशांक, शांघायचा एसएसई कंपोझिट निर्देशांक आणि हाँगकाँगचा हँग सेंग कमी स्थिरावला. युरोपातील बाजार दुपारपर्यंत नकारात्मक क्षेत्रात व्यवहार करत होते. बुधवारी अमेरिकन बाजारात मोठी घसरण झाली. जागतिक तेल बाजारात ब्रेंट क्रूड १.३७ टक्क्यांनी घसरून ६४.०२ डॉलर प्रति बॅरल झाला.

विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी बुधवारी २,२०१.७९ कोटी रुपयांच्या शेअर्सची खरेदी केली. बुधवारी बीएसई सेन्सेक्स ४१०.१९ अंकांनी वाढून ८१,५९६.६३ वर तर निफ्टी १२९.५५ अंकांनी वाढून २४,८१३.४५ वर बंद झाला.

### ऊर्जा, फोकस्ड आयटी, तेल व वायू आणि वाहन क्षेत्राला फटका

बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.३३ टक्क्यांनी घसरला तर स्मॉलकॅप निर्देशांक ०.१७ टक्क्यांनी वाढला. क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये ऊर्जा निर्देशांक सर्वाधिक १.२५ टक्क्यांनी घसरला. त्यानंतर एफएमसीजी (१.२५ टक्के), बीएसई फोकस्ड आयटी (१.१९ टक्के), तेल आणि वायू (१.१३ टक्के), आयटी (१.०९ टक्के) आणि वाहन (०.८७ टक्के) क्षेत्र घसरले. दूरसंचार आणि सेवांमध्ये वाढ झाली. बीएसईमध्ये २,१७८ समभाग घसरले, तर १,७४१ समभाग वधारले आणि १६७ समभाग अपरिवर्तित राहिले.

# रिझर्व्ह बँक आज लाभांश जाहीर करणार

### केंद्र सरकारला २.५६ लाख कोटींचा लाभांश मिळण्याचा अंदाज

**मुंबई :** रिझर्व्ह बँक शुक्रवारी २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारला देण्यात येणाऱ्या लाभांश रकमेची घोषणा करण्याची शक्यता आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी, आरबीआयने सरकारला २.१ लाख कोटी रुपयांची विक्रमी अतिरिक्त रक्कम किंवा लाभांश हस्तांतरित केला होता. ही रक्कम २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी देण्यात आलेल्या ८७,४१६ कोटी रुपयांच्या दुप्पट होती.

यावेळी लाभांश देयके जास्त असण्याची अपेक्षा आहे, ज्याचा निर्णय शुक्रवार,२३ मे रोजी होणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत घेतला जाण्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्यात, आरबीआयच्या केंद्रीय मंडळाने आर्थिक भांडवल चौकटीचा (ईसीएफ) आढावा घेतला जो सरकारला अतिरिक्त रक्कम हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यासाठी आधार आहे.

आरबीआयने म्हटले होते की, कार्यक्रमाचा भाग म्हणून संचालक मंडळाने ईसीएफचा आढावा घेतला. रिझर्व्ह बँकेच्या विद्यमान आर्थिक भांडवल चौकटीचा आढावा घेण्यासाठी बिमल जालान यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीच्या शिफारशींनुसार २६ ऑगस्ट २०१९ रोजी रिझर्व्ह बँकेने स्वीकारलेल्या ईसीएफच्या आधारे हस्तांतरणीय लाभांश रक्कम निश्चित केली जातो.

समितीने शिफारस केली होती की आकस्मिक जोखीम बफर (सीआरबी) अंतर्गत जोखीम तरतूद आरबीआयच्या ताळेबंदाच्या ६.५ ते ५.५ टक्के या मर्यादेत राखली जावी.

चालू आर्थिक वर्षाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात रिझर्व्ह बँक आणि सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्थांकडून २.५६ लाख कोटी रुपयांचा लाभांश मिळण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

# २०२८ पर्यंत जीडीपी दर ६.४ टक्क्यांपर्यंत वाढेल

### फिचचा भारतासाठी नवा अंदाज जाहीर




**नवी दिल्ली :** फिच रेटिंग्जने गुरुवारी भारताची सरासरी वार्षिक विकास दर (जीडीपी) २०२८ पर्यंत ६.४ टक्क्यांपर्यंत वाढवला, जो नोव्हेंबर २०२३ मध्ये अंदाजित ६.२ टक्क्यांवरून नक्कीच जास्त आहे. भारतीय अर्थव्यवस्था २०२३ च्या अहवालाच्या वेळी आमच्या अपेक्षेपेक्षा अधिक मजबूतपणे परतली, जी साथीच्या धक्क्यामुळे कमी प्रतिकूल परिणाम दर्शवते, असे फिचने पाच वर्षांच्या पुढील संभाव्य जीडीपी अंदाज जाहीर करताना म्हटले आहे.

फिचने आपल्या ताज्या अंदाजात २०२३-२०२८ साठी भारताचा सरासरी विकास दर अंदाज ६.२ टक्क्यांवरून ६.४ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. जागतिक आर्थिक दृष्टिकोन (जीईओ) मध्ये समाविष्ट असलेल्या १० उदयोन्मुख बाजारपेठ अर्थव्यवस्थांसाठी पुढील पाच वर्षांत मध्यम-मुदतीच्या संभाव्य जीडीपी अंदाज किंचित कमी केले आहेत.

फिचने म्हटले आहे की, आमच्या नवीन अंदाजात जीडीपी भारित आधारावर ३.९ टक्के वाढ दिसून येते, जी नोव्हेंबर २०२३ मध्ये प्रकाशित झालेल्या आमच्या मागील मूल्यांकनात ४ टक्क्यांपेक्षा कमी आहे. आमचा अभारित सरासरी ईएम१० संभाव्य वाढीचा अंदाज ३.१ टक्के आहे, जो २०२३ च्या अहवालापेक्षा फक्त जास्त आहे.

### या महिन्यात डेरिव्हेटिव्हज् करारांच्या समाप्तीबाबत सेबी निर्देश जारी करणार

बाजार नियामक सेबी सल्लामसलत पत्रावरील टिप्पण्यांचे विश्लेषण केल्यानंतर इक्विटी डेरिव्हेटिव्हज् करारांच्या समाप्तीबाबत या महिन्यात निर्देश जारी करेल, असे त्याचे अध्यक्ष तुहिन कांता पांडे यांनी गुरुवारी सांगितले. मार्चमध्ये जारी केलेल्या त्यांच्या सल्लामसलत पत्रात, एक्सचेंजेसमधील सर्व इक्विटी डेरिव्हेटिव्हज् करारांच्या समाप्ती मंगळवार किंवा गुरुवारपर्यंत मर्यादित असाव्यात, असा प्रस्ताव सेबीने ठेवला होता. पत्रकारांशी बोलताना पांडे म्हणाले, सध्या, जे काही नियम आहेत, आम्ही सल्लामसलत पत्रावर पेपर जारी करणार आहोत आणि आम्ही टिप्पण्यांचे विश्लेषण करू. समित्यांची बैठक झाली आहे आणि लवकरच आम्ही या महिन्याच्या आत स्पष्टीकरण जारी करू.

# इंडसइंड बँकेच्या अधिकाऱ्यांकडून गंभीर उल्लंघन झाल्याची चौकशी सुरू

### सेबी प्रमुखांची माहिती


**नवी दिल्ली :** अकाऊंटिंग फसवणुकीने त्रस्त असलेल्या इंडसइंड बँकेच्या वरिष्ठ व्यवस्थापनाकडून कोणत्याही गंभीर उल्लंघन झाल्याची चौकशी बाजार नियामक सेबी करत आहे, असे संस्थेचे अध्यक्ष तुहिन कांता पांडे यांनी गुरुवारी सांगितले.

पांडे म्हणाले की, इंडसइंड बँकेतील समस्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) हाताळेल, परंतु सेबी संकटग्रस्त बँकेच्या अधिकाऱ्यांकडून सिक्युरिटीज मार्केट उल्लंघनांवरही लक्ष ठेवून आहे. सेबीला, सेबीचे जे काही काम आहे, ते सेबी करत आहे. जर त्यांच्या क्षमतेतील कोणाकडूनही काही गंभीर उल्लंघन झाले असेल तर सेबी त्याची चौकशी करत आहे, असे पांडे यांनी उद्योग संस्था असोचेमने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या बाजूला पत्रकारांना सांगितले.

बुधवारी इंडसइंड बँकेच्या बोर्डाने सांगितले की, त्यांना या फसवणुकीत काही कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा संशय आहे आणि त्यांनी बँकेला तपास संस्था आणि नियामक अधिकाऱ्यांना प्रकरणाची तक्रार करण्याचे निर्देश दिले आहेत. डेरिव्हेटिव्हज्, मायक्रोफायनान्स पोर्टफोलिओमधील फसवणूक तसेच बॅलन्स शीटच्या खुलाशांमुळे खाजगी क्षेत्रातील बँकेला धक्का बसला आहे. उच्चस्तरीय पदावरील लोकांचे राजीनामे मिळालेल्या या बँकेने अंतर्गत ऑडिटचा आढावा करण्याचे आदेश दिले आहेत आणि फॉरेन्सिक चौकशी सुरू आहे.

बँकेच्या अंतर्गत ऑडिट अहवालात प्रमुख अंतर्गत नियंत्रणे ओलांडण्यात माजी महत्त्वाचे मॅनेजमेंट पर्सोनेल (केएमपी) यांच्यासह वरिष्ठ बँक अधिकाऱ्यांचा सहभाग उघड झाला आहे. बँकेने केंद्र सरकारला अकाऊंटिंग फसवणुकीत वरिष्ठ व्यवस्थापनाचा सहभाग असल्याची शक्यता नोंदवली आहे.

### एनएसई आयपीओच्या समस्या लवकरच सोडवल्या जातील : सेबी प्रमुख




**नवी दिल्ली :** भारतीय सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड (सेबी) चे अध्यक्ष तुहिन कांता पांडे यांनी गुरुवारी सांगितले की, नॅशनल स्टॉक एक्स्चेंज (एनएसई) च्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ) भोवती असलेले प्रलंबित प्रश्न लवकरच सोडवले जातील आणि नियामक प्रक्रिया पुढे नेईल.

असोचॅमच्या येथे झालेल्या कार्यक्रमादरम्यान माध्यमांशी बोलताना पांडे म्हणाले, एनएसई आणि सेबी चर्चा करत आहेत. ते समस्या सोडवत आहेत. मला खूप आशा आहे की ते लवकरच होईल आणि आम्ही पुढे जाऊ. विशिष्ट वेळेबद्दल विचारले असता, सेबी प्रमुख म्हणाले की ते तारीख सांगू शकत नाहीत परंतु सर्व प्रलंबित प्रश्न सोडवले जातील.

### बाजार भांडवल ५.१ ट्रिलियन डॉलरवर

असोचेमच्या कार्यक्रमात, एनएसईचे एमडी आणि सीईओ आशिष कुमार चौहान यांनी भारताच्या भांडवली बाजारांच्या मजबूत कामगिरीवर प्रकाश टाकला. चौहान यांनी नमूद केले की भारत आता जगातील चौथ्या क्रमांकाचा इक्विटी बाजार बनला आहे. १९९४ पासून एनएसईने कामकाज सुरू केले तेव्हापासून भारताचे बाजार भांडवल १२० पटीने वाढले आहे. आज ते अंदाजे ४४० लाख कोटी रुपये किंवा ५.१ ट्रिलियन डॉलर इतके आहे, असे त्यांनी उपस्थितांना सांगितले.



### प्रमुख अन्नधान्य पिकांचे सरासरी बाजारभाव

# किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी

### रिझर्व्ह बँकेच्या ताज्या बुलेटिनमधील लेखातील माहिती

**मुंबई :** खरीप आणि रब्बी पिकांचे भरघोस उत्पादन झाल्यामुळे गहू वगळता प्रमुख अन्नधान्य पिकांचे सरासरी बाजारभाव किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी आहेत, असे रिझर्व्ह बँकेच्या ताज्या बुलेटिनमध्ये म्हटले होते. तसेच, १९ मे पर्यंतच्या अन्नधान्य किमतीच्या आकडेवारीनुसार धान्य आणि डाळींच्या किमतींमध्ये मोठी घट झाली.

केंद्र सरकारने १४ खरीप, सात रब्बी आणि दोन व्यावसायिक पिकांसाठी २३ पिकांसाठी किमान आधारभूत किंमत (एमएसपी) निश्चित केली आहे. तथापि, अन्न सुरक्षेच्या उद्देशाने ते केंद्रीय साठ्यासाठी काही वस्तू, विशेषतः गहू आणि तांदूळ खरेदी करते.

आरबीआयच्या मे बुलेटिनमध्ये प्रकाशित झालेल्या अर्थव्यवस्थेच्या स्थितीवरील लेखात पुढे म्हटले आहे की, दुसरीकडे, खाद्यतेलाच्या किमती वाढतच राहिल्या-सोयाबीन, सूर्यफूल आणि मोहरीच्या तेलामुळे, तर पाम आणि शेंगदाणा तेलाच्या किमती कमी झाल्या. प्रमुख भाज्यांमध्ये कांद्याच्या किमतीत आणखी घट झाली आहे, तर बटाटा आणि टोमॅटोच्या किमतीत वाढ झाली आहे.

मुख्य खरीप आणि रब्बी पिकांच्या भरघोस उत्पादनानंतर आणि अन्नधान्य महागाई रोखण्यासाठी धोरणात्मक उपाययोजनांच्या मालिकेनंतर प्रमुख अन्न पिकांच्या (गहू वगळता) सरासरी बाजारभाव कमी झाल्याचे दिसून येते आणि ते त्यांच्या किमान आधारभूत किमतींपेक्षा (एमएसपी) खाली आहेत, जे देशाच्या अन्न सुरक्षेसाठी चांगले संकेत आहेत, असे लेखात म्हटले आहे.


लेखाच्या लेखकांनी सांगितले की सरासरी बाजारभावांची आकडेवारी १ एप्रिल ते १९ मे २०२५ या कालावधीची आहे. लेखात व्यक्त केलेले विचार लेखकांचे आहेत आणि ते भारतीय रिझर्व्ह बँकेचे विचार दर्शवत नाहीत, असे केंद्रीय बँकेने म्हटले आहे.

राजस्थान आणि मध्य प्रदेशने गव्हाच्या किमान आधारभूत किमतीवर १५० रुपये प्रति क्विंटल आणि १७५ रुपये प्रति क्विंटल बोनस जाहीर केला आहे. तसेच उन्हाळी पिकांच्या बाबतीत, विशेषतः डाळींची पेरणी जवळजवळ पूर्ण झाली आहे असे लेखात म्हटले आहे. १६ मे २०२५ पर्यंत भाताची पेरणी (एकूण उन्हाळी लागवडीच्या सुमारे ४३ टक्के) पूर्ण हंगामातील सामान्य क्षेत्राच्या १०७.६ टक्के होती, तर हरभरा किंवा मूग (एकूण हंगामातील लागवडीच्या सुमारे २७ टक्के) १०८.२ टक्के होती.

# ढोरकीन येथील तरूणाचा विद्यूत शॉक लागून दुर्दैवी मृत्यु.

### ढोरकीन येथे पंपगृहातील रोहीत्राची दुरूस्ती करताना विद्यूत शाँक लागून तरूणाचा मृत्यू..

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**



पैठण तालुक्यातील ढोरकीन येथील समाजकल्याण कॉलनीतील ३५ वर्षीय तरूणाचा विजेच्या जोराच्या धक्क्याने करूण अंत झाला. डॅनियल सुंदरलाल वाघमारे असे दुर्दैवी मृत तरुणाचे नाव आहे. याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की,मंगळवारी दि.२० रोजी रात्री सात वाजेच्या दरम्यान डॅनियल सुंदरलाल वाघमारे (वय ३५ वर्षे) हा छत्रपती संभाजिनगर महानगर पालिकेच्या ढोरकीन येथील समाजकल्याण कॉलनीतील पंपहाऊसमधील विद्युत रोहित्रातील बिघाड दुरुस्त करण्याचे काम करत असताना अचानक विजेचा शॉक लागल्याची दुर्दैवी घटना घडली. यात गंभीर जखमी डॅनियल यास बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात दाखल केले असता तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषित केले. मृत डॅनियल यांच्या पार्थिवावर ढोरकीनच्या स्मशानभूमीत बुधवारी दुपारी तीन वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, एक मुलगी, एक मुलगा, एक भाऊ, भावजाई, एक पुतण्या व एक पुतणी असा परिवार आहे. सदरील घटनेची पैठण औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक ईश्वर जगदाळे,पोलीस उपनिरीक्षक संभाजी झिंजूर्डे, पो. हे. कॉंस्टेबल दिनेश दाभाडे, राहुल महोतमल, कृष्णा उगले, संदीप कोलते आदी पोलीस अधिकारी व कर्मचारी करीत आहे.

# पनवेल महापालिकेच्या सूचना : जीवितहनी टाळण्यासाठी धोकादायक इमारती रिकाम्या करा

### पनवेल महानगरपालिकेच्यावतीने धोकादायक इमारतींची यादी जाहीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल महानगरपालिकेने सन 2025-26 या आर्थिक वर्षात कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक व धोकादायक इमारतींचे प्रभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात प्रभाग समिती अ- 18, प्रभाग समिती ब-15, प्रभाग समिती क- 10, प्रभाग समिती ड-37 अतंर्गत एकूण 80 सी-1 या प्रवर्गात मोडणाऱ्या मिळकती जाहिर करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीतील रहिवाश्यांना त्यांच्या सदनिका रिक्त करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 265 व 268 नुसार, तसेच राज्य शासनाच्या निर्देशांनुसार, सूचना देण्यात आल्या आहेत. महापालिकेच्या अहवालानुसार, एकूण 80 धोकादायक इमारती असल्याचे निष्पन्न झाले आहे. या इमारतींमध्ये पावसाळ्यात मोठा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे, अशा इमारतींतील नागरिकांनी तातडीने स्थलांतर करण्याबाबत महापालिकेच्यावतीने आयुक्त श्री.मंगेश चितळे यांनी सूचना दिल्या आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच राज्य शासनाने धोकादायक इमारतींवर कारवाई करण्याबाबत निर्गमित केलेल्या आदेशानुसार मुळ मालक, भोगवटादार यांना पुरेशी संधी देऊनही संबंधितांनी इमारत रिक्त करुन पाडण्याची कार्यवाही केली नाही तर या इमारतीचा विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा खंडीत करणे व त्यानुसार या इमारतींवर पोलीसांमार्फत निर्मनुष्य करुन पाडण्याची कार्यवाही मनपामार्फत करण्यात येत आहे. धोकादायक इमारत मालकांनी स्वतःहुन सुरक्षितरित्या पाडण्याची कार्यवाही करावी. धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवीत व वित्त हानी झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या संबंधित नागरीकांची तसेच इमारतीचे मालक व भाडेकरु यांची राहील. त्याचप्रमाणे अतिधोकादायक मालमत्तांचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्याची जबाबदारी संबंधित घरमालक किंवा भोगवटादार यांची राहणार. याकरीता महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नागरिकांनी नोंद घ्यावी. धोकादायक व अतिधोकादायक इमारतींची संपूर्ण माहिती ु. रिर्पीशश्रलौीरीळेप.लो या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच नागरिकांनी आपल्या आसपास धोकादायक इमारती असतील तर त्याची माहिती नजिकच्या प्रभाग अधिकाऱ्यांना द्यावी. जीवितहानी टाळण्यासाठी नागरिकांनी अशा धोकादायक इमारतींमध्ये राहू नये व दिलेल्या सूचनांचे पालन करावे. अधिक माहितीसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या टोल फ्री क्रमांक 1800-233-0009 वर तसेच 022-7458040/41/42 या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन उपायुक्त रविकिरण घोडके यांनी केले आहे.

# पांडवकडा पर्यटनाला यंदाही करण्यात आली प्रवेश बंदी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पावसाळा सुरू होताच पर्यटक विविध पर्यटनस्थळांना भेटी देत असतात. यावेळी नवी मुंबईतील खारघर येथील विशेष ओळख असणाऱ्या पांडवकडा धबधब्यावर जाणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. पनवेलसह मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे इत्यादी शहरांपासून हाकेच्या अंतरावर असलेला हा धबधबा पाहण्यासाठी हजारो पर्यटक येथे येतात. मात्र यंदा पर्यटकांच्या या आनंदावर विरजण पडणार आहे.

पावसाळा सुरू होताच डोंगराच्या उंच कड्यावरून कोसळणाऱ्या पांडवकडा धबधब्यावर चिंब भिजण्याची व मनमुराद आनंद घेण्यासाठी पावसाळ्यात पर्यटक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. बुधवारपासून पाऊस पडत असल्यामुळे पाण्याची धार कोसळत आहे. पावसाळ्यात पांडवकडा धबधब्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात; मात्र या वर्षी खारघर-तुर्भे लिंक रोडसाठी पांडवकडा धबधब्यालगत डोंगर फोडून बोगदा उभारण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. खारघर डोंगर फोडून निर्माण केल्या जाणाऱ्या भुयारी मार्गाची लांबी 1.763 किलोमीटर असून भुयारी मार्ग पाच पदरी असणार आहे. हा बोगदा धबधब्याला लागून काढला जात असून बोगदा खोदण्यासाठी लागणारी यंत्रे धबधब्यालगत उभारण्यात आली आहेत. त्यामुळे या वर्षी पावसाळ्यात पर्यटकांना पांडवकडा धबधब्यावर प्रवेश बंदी असणार आहे.

रात्रंदिवस कामासाठी स्वतंत्र वीजजोडणी सायन-पनवेल महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सिडकोकडून 5.4 किलोमीटर खारघर-तुर्भे जोड मार्ग तयार केला जात आहे. मार्गिकेची एकूण लांबी 5.490 किलोमीटर आहे. यासाठी खारघर डोंगर फोडून बोगदा उभारले जात आहे. बोगद्याचे काम बाराही महिने सुरू असणार आहे. भुयारी मार्गात काम करताना डोंगर फोडण्यासाठी लागणारी यंत्रे, तसेच कामगारांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊन बोगद्यात प्रकाश असावा यासाठी पांडवकडा धबधब्यापर्यंत स्वतंत्र विजेची गरज असल्यामुळे लोखंडी खांब टाकून स्वतंत्र वीजजोडणीचे काम वेगात सुरू आहे.

नाल्यावर तात्पुरता पूल खारघर गुरुद्वारापासून पांडवकडा धबधबा पार करताना मोठा नाला आहे. डोंगरावर मुसळधार पाऊस झाल्यास हा नाला दुथडी भरून वाहत असतो. पावसाळ्यात भुयारी मार्गाचे काम सुरू राहणार आहे. डोंगर फोडताना बाहेर पडणारे दगड बाहेर आणताना वाहनास कोणत्याही प्रकारचा धोका होऊ नये यासाठी गुरुद्वारा ते पांडवकडा डोंगरापर्यंत तात्पुरता; परंतु पक्का रस्ता आणि नाल्यावर लोखंडी पूल उभारला जात आहे. सिडकोच्या आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्कदरम्यान थेट कनेक्टिव्हिटी निर्माण होणार आहे. या कामासाठी सिडको 2,100 कोटी खर्च करीत असून हा प्रकल्प 31 डिसेंबर 2028 अखेरपर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचा सिडकोचा संकल्प आहे.